। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ५९ वा । गुरूवार दिनांक ०७ मे, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान धाराशिव शहर पोलीसांनी दि.०५.०५.२०२६ रोजी धाराशिव शहर पोलीस ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापा टाकला. यावेळी सोनु रा. छत्रपती शिवाजी महाराज चौक धाराशिव ता. जि. धाराशिव हे धाराशिव ते सांजा जाणारे रोडलगत नगर पालिकेचे सार्वजनिक शौचालयाचे समोर मिलन नाईट जुगाराचे साहित्या असा एकुण ४१५ रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव शहर पो. ठाणेच्या पथकास आढळले.तर राहुल रा.इंगळे गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव हे धारासुर मर्दिनी कमानी जवळ हॉटेल स्वराज समोरील रोडवर मटका जुगाराचे साहित्या असा एकुण ७४० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव शहर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

### धाराशिवातून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भैरुनाथ संभाजी काळे, वय ५० वर्षे,रा. घर नं १७६५ सिटी पॉईन्ट हॉटेलच्या पाठीमागे कोर्ट कॉलनी सांजा रोड धाराशिव ता. जि. धाराशिव यांची मोरटसायकल सिटी पॉईन्ट हॉटेलच्या पाईमागे कोर्ट कॉलनी सांजा रोड धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भॅरुनाथ काळे यांनी दि.०५.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंनदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### जखमी होवून झाले मयत

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मारुती नाना कसबे, वय ३० वर्षे, रा. मातंगनगर तुळजापूर ता.तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२२.०४.२०२६ रोजी सोलापूर ते धाराशिव जाणारे रोडवर रामदरा तलावाजवळ रोड ओलांडुन पायी जात होते. दरम्यान सोलापूर ते धाराशिव जाणारे रोडवर रामदरा तलावा जवळ तुळजापूर येथे अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे हायगईने व निष्काळजीपणे चालवून मारुती कसबे यांना धडक दिली. या अपघातात मारुती कसबे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- दत्ता नाना कसबे, वय २७ वर्षे, रा.मातंगनगर तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०५.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

## धाराशिव ध्वजदिन निधी संकलनात राज्यात तिसरे ; उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान




धाराशिव (जिमाका)- सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निमित्त निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी करत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.या उत्कृष्ट कार्याची दखल घेत पालकमंत्री श्री.प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते १ मे रोजी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून पाळण्यात येतो.या निमित्ताने दरवर्षी ७ डिसेंबरपासून पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत निधी संकलन मोहीम राबविण्यात येते. ध्वजदिन निधी-२०२४ साठी महाराष्ट्र शासनाकडून धाराशिव जिल्ह्यास ५७ लक्ष रुपये इतके उद्दिष्ट देण्यात आले होते.

मात्र जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच विविध संस्थांच्या सक्रिय सहकार्यामुळे हे उद्दिष्ट केवळ पूर्णच झाले नाही,तर त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक निधी संकलित करण्यात आला. एकूण १ कोटी ३४ हजार ८४ हजार रुपये इतका निधी जमा करण्यात आला असून, हे प्रमाण दिलेल्या उद्दिष्टाच्या तब्बल २३६.५६ टक्के इतके आहे.

या उल्लेखनीय यशामुळे जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.या पार्श्वभूमीवर १ मे २०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात संचालक,सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून प्राप्त स्मृतिचिन्ह जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

या सन्मानामुळे जिल्ह्यातील सर्व संबंधित विभाग,अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव झाला असून,देशसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या या उपक्रमात धाराशिवने उंच भरारी घेतली आहे.

## युवकांसाठी सुवर्णसंधी ! प्रधानमंत्री इंटरशिप योजनेचा तिसरा टप्पा सुरू

धाराशिव (जिमाका)- देशातील युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा आणि उद्योगविश्वाशी त्यांचा संपर्क वाढावा यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री इंटरशिप योजनेचा तिसरा टप्पा सुरू केला आहे.या योजनेअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना देशातील आघाडीच्या कंपन्या व आस्थापनांमध्ये ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिपची संधी उपलब्ध होणार आहे.

या योजनेचे विशेष आकर्षण म्हणजे उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार असून, इंटरशिप यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर ६ हजार रुपये एकरकमी अनुदानही प्रदान केले जाईल. याशिवाय प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला भारत सरकारतर्फे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत विमा संरक्षण देण्यात येणार आहे.इच्छुक उमेदवारांनी ु. ळिपींशीहिळ.िलर.सीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन प्रथम नोंदणी करून आपला प्रोफाईल तयार करावा.त्यानंतर विविध क्षेत्रांतील उपलब्ध इंटरशिपसाठी अर्ज करता येणार आहे.

या योजनेसाठी पात्रतेच्या अटी निश्चित करण्यात आल्या असून, उमेदवार किमान १० वी,१२ वी, पॉलिटेक्निक,डिप्लोमा किंवा पदवीधर असणे आवश्यक आहे. तसेच वय १८ ते २५ वर्षांच्या दरम्यान असावे.उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे आणि कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी सेवेत नसावा.यापूर्वी संबंधित उमेदवाराने कोणतीही इंटरशिप,ॲप्रेंटिसशिप किंवा कौशल्य प्रशिक्षण घेतलेले नसावे,ही अटही लागू आहे.

योजनेच्या माध्यमातून युवकांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार असून, ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीत त्यांची कौशल्यवृद्धी होणार आहे.तसेच यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे.

तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि दिलेल्या संकेतस्थळावरून आपली इच्छुकता नोंदवावी,असे आवाहन सहायक आयुक्त,जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, धाराशिव यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक (०२४७२)-२९९४३४ वर संपर्क साधावा,असे कळविले आहे.

## आर्चरी,जिम्नॅस्टीक्स व कबड्डी स्पर्धांसाठी धाराशिव येथे प्रशिक्षण शिबिरांना सुरुवात

धाराशिव दि.६ मे (जिमाका) जिल्ह्यातील क्रीडापटूंना स्पर्धापूर्व सक्षम प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने आर्चरी,जिम्नॅस्टीक्स व कबड्डी या खेळांच्या स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरांना सुरुवात करण्यात आली आहे.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रामार्फत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरांत विविध क्रीडा प्रकारांसाठी अनुभवी मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात आली आहे.आर्चरी या खेळासाठी श्रीमती शुभांगी रोकडे या मार्गदर्शक असून हे प्रशिक्षण जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था येथे पार पडणार आहे.त्यांच्याशी संपर्कासाठी ९९२२०६२८२८ हा भ्रमणध्वनी क्रमांक देण्यात आला आहे.

जिम्नॅस्टीक्ससाठी श्रीमती डिंपल ठाकरे या मार्गदर्शक म्हणून कार्यरत असून,हे प्रशिक्षण श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम,धाराशिव येथे आयोजित करण्यात आले आहे. संपर्कासाठी ८७६६४२६८८४ हा क्रमांक उपलब्ध आहे.

कबड्डी या खेळासाठी विश्वास खंदारे हे मार्गदर्शक असून,गांधी विद्यालय, चिखली येथे हे प्रशिक्षण होणार आहे.संपर्कासाठी ८८३०५६०४०६ हा भ्रमणध्वनी क्रमांक देण्यात आला आहे.ही प्रशिक्षण शिबिरे दिनांक ५ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून,दररोज सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सराव सत्रे घेण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

## अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत ॲड. खंडेराव चौरे विजयी

धाराशिव (शेख अंजुम)--जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या वार्षिक निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी यंदा चुरस निर्माण झाली होती. अध्यक्ष पदाची निवडणूक लढविणार्या तीनपैकी ॲड. खंडेराव हरिश्चंद्र चौरे यांनी १९८ मताधिक्याने विजयश्री मिळविला आहे. त्यांनी ॲड. सुधाकर तांबे यांचा पराभव केला आहे. ॲड. तांबे यांना या निवडणुकीत १३४ मते मिळाली आहेत.

जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या वार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवड झालेले उमेदवार वगळता अध्यक्ष, उपाध्यक्ष (सर्वसाधारण), उपाध्यक्ष (महिला राखीव) आणि महिला प्रतिनिधी या चार पदांसाठी चुरशीची लढत झाली. सर्वसाधारण उपाध्यक्ष पदासाठी ॲड. इंद्रजित चिंतामणराव शिंदे व ॲड. सुधीर विठ्ठलराव नन्नवरे यांच्यात लढत झाली. एकूण ५१४ मतांपैकी ॲड. नन्नवरे यांना ४१४ तर ॲड. शिंदे यांना केवळ ७८ मते मिळाली. ॲड. नन्नवरे यांनी ३३६ मतांच्या फरकाने विजयश्री मिळविला आहे. उपाध्यक्ष (महिला राखीव) पदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. सारीका नागनाथ मुंडे-पाटील व ॲड. उज्वला गोरख इंगळे यांच्यात लढत झाली. ५१९ वैध मतांपैकी ॲड. सारीका मुंडे यांना २९५ मते तर ॲड. उज्वला इंगळे यांना २०२ मते पडली आहेत. मुंडे यांनी इंगळे यांचा ९३ मतांच्या फरकाने पराभव केला आहे. महिला प्रतिनिधी पदासाठी ॲड. अर्चना रामहरी नवले व ॲड. मायादेवी सुभाष सरवदे यांच्यात चुरशीची लढत झाली. या लक्षवेधी लढतीत ॲड. अर्चना रामहरी नवले यांनी ॲड. मायादेवी सरवदे यांचा तब्बल २१४ मतांनी पराभव करत विजयश्री मिळविली आहे.

या निवडणुकीत मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. नितीन भोसले यांनी काम पाहिले. दरम्यान निवडणूक निकाल जाहीर होताच विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी सर्व विजयी उमेदवारांचा सत्कार करून, गुलाल उधळून विजयोत्सव साजरा केला. ॲड. चौरे हे भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष असून भाजपा पक्षातील सक्रिय पदाधिकारी आहेत.

## धाराशिवमध्ये इंधन टंचाईचा गैरसमज ; पुरवठा सुरळीत, अनावश्यक गर्दी टाळण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका) सद्यस्थितीत काही देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या तणावपूर्ण पार्श्वभूमीवर देशात इंधन टंचाई निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे.त्याचा परिणाम म्हणून जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर नागरिकांनी अतिरिक्त साठा करण्यासाठी गर्दी केल्याचे दिसून येत आहे.मात्र, जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याची माहिती प्रशासनाने स्पष्ट केली आहे.

या पार्श्वभूमीवर आज ५ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तेल कंपन्यांच्या (एच. पी.सी.एल., बी.पी.सी.एल.,आय. ओ.सी.एल.) विक्री प्रतिनिधींसमवेत बैठक घेण्यात आली.या बैठकीत संबंधित कंपन्यांचे डेपो पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.तसेच,पंपधारकांच्या मागणीनुसार आवश्यकतेनुसार पेट्रोल व डिझेलचा पुरवठा तात्काळ करण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान,एप्रिल महिन्याच्या तुलनेत मे महिन्यात पेट्रोल व डिझेल विक्रीत वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. यामागे नागरिकांनी अफवांच्या पार्श्वभूमीवर केलेली अतिरिक्त खरेदी कारणीभूत असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले

.त्यामुळे सर्व पेट्रोल पंप चालकांनी इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या सूचना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिल्या आहेत.

तसेच,जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील पेट्रोल पंपांची सखोल तपासणी करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. तपासणीदरम्यान कोणताही दोष आढळल्यास संबंधित पंप चालकांवर पेट्रोलियम अधिनियम २००२ तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची इंधन टंचाई नसून सर्व पंपांवर नियमित पुरवठा सुरू आहे.त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी,असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.अधिकृत माहितीसाठी नागरिकांनी थेट जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही कळविले आहे.

## जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलची टंचाई भासू नये म्हणून वेळेत उपाययोजना करा -खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर

धाराशिव जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. अनेक पेट्रोल पंपांवर इंधन उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात कृत्रिम तुटवडा निर्माण करून जादा दराने विक्री केली जात असल्याचेही निदर्शनास येत आहे. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी वर्गाची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिळवणूक होत असून, जिल्ह्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेती मशागतीची कामे वेगाने सुरू आहेत. अशा अत्यावश्यक काळात इंधनाची कमतरता भासत असल्यामुळे शेतकऱ्यांची कामे खोळंबत आहेत व त्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच दैनंदिन कामकाजासाठी इंधनावर अवलंबून असलेल्या नागरिकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील प्रशासन, जिल्हा पुरवठा विभाग आणि पोलीस यंत्रणा यांच्या समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. प्रत्येक पेट्रोल पंपावर इंधन टँकर येऊन उतरत असताना तसेच इंधन वितरणाच्या प्रक्रियेदरम्यान शासकीय अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित राहिल्यास पारदर्शकता राखली जाऊन गैरप्रकारांना आळा बसू शकतो.

तसेच प्रत्येक पंपावर उपलब्ध असलेला दररोजचा इंधन साठा नागरिकांना सहजपणे दिसेल अशा ठिकाणी दर्शविणे आणि तोच साठा समाज माध्यमांवर जाहीर करणे गरजेचे आहे, जेणेकरून अफवा पसरू नयेत आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण होईल.

दरम्यान, इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडूनही अपेक्षित प्रमाणात पुरवठा होत नसल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. अनेक परवानाधारक विक्रेत्यांनी पूर्ण रक्कम अदा करूनही वेळेवर इंधन मिळत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संबंधित कंपन्यांनी पुरवठ्याचे निकष स्पष्ट करणे तसेच मागणीप्रमाणे नियमित व सुरळीत इंधन पुरवठा सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी कंपन्यांचे प्रतिनिधी व पेट्रोल पंपचालक यांची संयुक्त बैठक घेऊन ठोस नियमावली तयार करणेही गरजेचे आहे.

सदर परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात व जिल्ह्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

तसेच या संदर्भात जिल्हाधिकारी आणि संबंधित तेल कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे प्रादेशीक व्यवस्थापक,बी.पी.सी.एल./एच.पी.सी.एल/ आय.ओ.सी.एल. पाकणी डेपो सोलापूर यांना तक्रार सादर करण्यात आली असून, तात्काळ कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ममताचा आठमुठपना....

प. बंगालच्या विधानसभेच्या निवडणुकीत ममता बॅनर्जींचा मोठा परभव झाला. एकीकडे लोकशाही मानणारे मंडळी तर दुसरीकडे अपयश आल्यास त्याच लोकशाहीवर टिका करणारी मंडळी दिसून येते. चांगली अभ्यासू जनमानसात वजन असणारी मंडळीसुद्धा लोकशाहीवर अविश्वास व्यक्त करतात हे योग्य नाही. निवडणुकीत यश आले की लोकशाहीवर संयश घ्यायचा नाही मात्र अपयश आले की, संशय घेणे योग्य नाही. सध्याला लोकशाही बाबत बरेच बोलले जातें. लोकशाही धोक्यात आहे. असे बरेच मत व्यक्त केले जाते. भारतात विपुल लोकशाही आहे. दुसरे संविधानाबाबत बोलले जाते. वास्तविक ज्या राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा मान राखला जात नसेल तर त्यांना त्यांचीच भाषाने समजावे लागेल. सध्याला उत्तरप्रदेशात योगीबाबास का मानतात तेथे लवकर निर्णय घेतला जातो. प. बंगाल मध्ये किती घुसखोरी झाली व होत होत होती. भारताची ज्यावेळी फाळणी झाली, ही कशाच्या आधारावर! दुसरे जम्मूकाश्मीर मधून हिंदू पंडितांवर अन्याय, अत्त्याचार करून हाकलून लावले त्यावेळी घटना नव्हती काय.देशाबाहेर प्रांत होता. संविधान नव्हते का? त्यावेळी हिंदु असो किंवा अहिंदु असो तो मानव होता माणुसकीप्रमाणे सन्मान होणे अपेक्षित होते. मानवतेचे दर्शन घडविणे आवश्यक होते ते झाले नाही. आज देशात अनेक राज्यात घुसखोरी होते तरी शिकलेली मंडळी गप्पच दिसून येते. भारतीय घटनेनुसार पाच राज्यात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. प. बंगालमध्ये वेगळ्या पद्धतीने निवडणुका घेतेल्या नाहीत. मतदान झाले. प्रचार झाला. निकाल लागला असे असताना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नाही असे वक्तव्य करणे हे लोकशाही व कायद्यानुसार योग्य आहे का? हा बालिशपना आहे. हे लक्षात येते. जनमताचा कौल मान्य करून सन्मानाने जनतेची सेवा केली पाहिजे. आता आझाद आहोत, हिंदुची सेवा किंवा अहिंदुची सेवा ममतांनी करावी, कोणी आडवीणार नाही. वास्तविक ममता बॅनर्जी यांनी हिंदु किंवा अहिंदूची सेवा केली नाही तर दोघात वैर निर्माण करून आपली पोळी भाजून घेण्याचे काम केले. दंगे, हत्त्या अशा हिंसक कामे जाहिररित्या दिसून येत होत्या. आज प. बंगालमध्ये अहिंदु समाधानी दिसून येत नाहीत. त्यांना खालच्या स्तरावरील ममताचे राजकारण नको म्हणून ममताला हार पत्कारावी लागली. त्यांचा पक्ष व त्या निवडुण येवू शकल्या नाहीत. हे उघड आहे. शर्म नसल्यासारखे पद सोडण्यास नकार दिला जातो. कायद्याने चालणारा देश आहे. पद सोडणार नसेल तर राज्यपाल कायद्यानुसार निर्णय घेवू शकतात. हिंसा घडविण्याचे धाडस तसेच पराजय पचवायाचे देखिल धाडस लागते ते ममता यांच्यात दिसून येत नाही. देश हा एका कोण्याचा नाही तर असंख्य बलिदान देणाऱ्यांचा आहे. बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळविले आहे. रक्ताच्या नद्या वाहिल्या आहेत. अहिंसेने स्वराज्य मिळाले नाही हे ममताला माहिती नसावे. लोकशाही निर्माण करण्यासाठी, घटना लिहिण्यासाठी किती अभ्यास करावा लागला. त्याची अमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावे लागले असे असताना घटनेनुसार पद सोडण्यास तयार नसतील तर अशा प्रवृत्तीस काय म्हणावे. देशात अनेक राज्य आहेत. त्यापैकी बावीस राज्य भाजपा व मित्र पक्षाकडे आहेत. या बावीस राज्यातील जनता विचारी नसेल का? डोळे झाकून भाजपा स्विकारत आहे का? आज योगी बाबाचा गौरव का होतो तर त्यांचे काम बोलते आहे. तलाक सारखा मातृशक्तीला आत्मसन्मान देणारा कायदा केला केला. राममंदीर आयोध्यात होण्यासाठी धाडसी निर्णय घेवून वाद संपुष्ठात आणला. निर्णय घेण्यासाठी धाडस लागते. बेगडीपना चालत नाही. सणाच्यावेळी त्यांच्याघरी जावून जेवन करणे म्हणजे त्या समाजाची उन्नती नाही. कोणते निर्णय अहिंदुसाठी प. बंगालमध्ये घेण्यात आले? अहिंदु का भरकटला गेला व जात आहे. राजकारण हे समाजकारण असले पाहिजे. वाद व हिंसा घडविण्याचे काम कदापी होता नाही. लोकशाहीचा आदर करणाऱ्यांनी विचार करा. लोकशाही नुसार निवडणुका झाल्या मग जनमताचा आदर करून पद सोडणे आवश्यक आहे का नाही? घटना, संविधानाचा विचार जम्मूकाश्मीरमध्ये आपल्याच भाऊ-बहिण, आई-वडील अशा नातेसंबंधानाची हत्त्या व विटंबना होत होती त्यावेळी हीच मंडळी गप्प होती. काँग्रेस पक्ष आजचा नाही तर स्वातंत्र्यपुर्व काळापासूनचा आहे. चांगला अभ्यासू आहे तरी राहुल व प्रियंका गांधी घटनेबाबात संशय व्यक्त करतात हे योग्य नाही. देशात किती राज्यात स्वबळावर सत्ता मिळविण्यात काँग्रेसला यश मिळविता आले याचा विचार करावा. पहिल्यांदा भाजपाचे दोनच खासदार लोकसभेंत होते, आज केंद्रसरकार चालवित आहेत. याचा तरी विरोधकांनी विचार करावा. जनता दूर कधी जाते तर जनतेविषयक काम कामे नाही केल्यास! जनतेसोबत न राहाता जनतेचे प्रश्न मार्गी न लावल्यास. जनता सोबत राहात नाही. एखादा गुंड घ्या, उदा. घ्यायचे झाले तरी गुंड न्याय देतो, संरक्षण देतो म्हणून काही जनता सर्वच नाही काही बोटावर मोजण्याईतकी मंडळी जाते, देव मानते. एका गुंडाला मानते कारण तो जनतेची कामे करतो, हे का विसरले जाते. एकनिष्ठता नाही. जात-धर्माबाबत आदर ठेवला पाहिजे. कधी काय बोलावे हेच कळून येत नसेल तर जनता कशी स्विकारणार? त्यामुळे लोकशाही, घटना-संविधानावर टिका करणे सोडून घटना-संविधानानुसार वागले पाहिजे. आदर केला पाहिजे. केवळ लोकशाहीच स्वार्थासाठी वापर करणे सोडून दिले पाहिजे. निवडणुका झाल्या, निकाल जाहिर झाला त्याचा जनमताचा आदर केला पाहिजे. जे चुकीचे केले ते लोकशाहीत शिक्षाम्हणून भोगणास तयार असले पाहिजे. एकदा पराजय झाला की, संपले जाते असे होत नसते. त्यामुळे जे घटनेनुसार नियम आहेत त्याचा आदर सर्वांनी केला पाहिजे, त्यानुसार चालले पाहिजे, पराभुत झाले तरी पद सोडणार नाही असे उच्चपदी असणाऱ्यांना शोभत नाही हे सर्वच राजकाण्यांनी लक्षात घेतले पाहिजे. ममता बॅनर्जी यांनी आठमुठपना सोडून आतातरी जनतेसोबत राहाणे योग्य ठरणारे आहे. त्याकाही भारत सोडून जावू शकणार नाही किंवा इतर देश त्यांना स्विकारणार नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे.

# धाराशिवच्या ऐतिहासिक गडांना नवे जीवन : नळदुर्ग आणि परांडा किल्ल्यांच्या जतन-संवर्धनासाठी कोट्यवधींची योजना



जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग हे एक ऐतिहासिक स्थान असून,येथे असलेला नळदुर्ग किल्ला हा प्रमुख आकर्षण आहे.हा किल्ला प्राचीन काळातील महत्त्वाचा किल्ला मानला जातो.किल्ल्याची मूळ उभारणी कल्याणीच्या चालुक्य काळात झाल्याची नोंद आहे.त्या काळात चालुक्यांची राजधानी असलेल्या कल्याणी शहराच्याजवळ असल्यामुळे या किल्ल्याला विशेष महत्त्व होते. सुरुवातीला हा किल्ला मातीचा गढीवजा होता.यानंतर बहामनी सत्तेच्या काळात या किल्ल्याचे रूपांतर भक्कम दगडी बांधकामात करण्यात आले.इ.स. १३५१ ते १४८० या कालावधीत बहामनी सुलतानांनी या किल्ल्याचा विस्तार केला.पुढे आदिलशाही काळात किल्ल्याचे नाव 'शहादुर्ग' असे ठेवण्यात आले.इब्राहिम आदिलशहा दुसरा यांच्या कारकीर्दीत इ.स.१६१३ मध्ये बोरी नदीवर बंधारा बांधून 'पाणी महल'ची निर्मिती करण्यात आली.हा पाणी महल त्या काळातील स्थापत्यशास्त्र व अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा किल्ला हैदराबादच्या निजामाच्या अखत्यारीत गेला आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत त्याच ताब्यात राहिला. निजाम शासनाच्या १२ जानेवारी १९५३ च्या अधिसूचनेनुसार किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारक घोषित केले.राज्य पुनर्रचनेनंतर हा किल्ला महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात आला असून त्याची देखभाल व दुरुस्तीचे काम पुरातत्व विभागामार्फत केले जाते.



**विभागीय निधी अंतर्गत व्यापक विकास आराखडा :**

नळदुर्ग किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार,या स्मारकाचा 'महावारसा विशेष स्मारक योजना' अंतर्गत समावेश करण्यात आला आहे.या कामासाठी वास्तुविशारदांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी रुपये १० कोटी ८७ लक्ष ५५ हजार ६९८ रुपये इतक्या रकमेचा सविस्तर विकास आराखडा तयार केला आहे.हा प्रस्ताव दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**या आराखड्यातील प्रमुख कामे पुढीलप्रमाणे आहेत :**

स्मारक परिसरातील झाडेझुडपे काढणे,शास्त्रोक्त पद्धतीने उत्खनन, तटबंदीचे मजबुतीकरण,दगडी पायऱ्या व गार्ड रेलिंग,रणमंडल भागातील तटबंदीची दुरुस्ती,भेगा पडलेल्या भिंतींना ग्राऊटिंग,पाणी महल व उपळी बुरुज परिसरातील दुरुस्ती,दगडी पाथवे निर्माण, पर्यटकांसाठी दिशादर्शक फलक, स्मारकाचे दस्तऐवजीकरण,इतर पूरक कामे आदी कामांचा समावेश आहे.प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

**जिल्हा नियोजन निधीतूनही संवर्धनाला चालना :**

शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत गडकिल्ले,मंदिरे व संरक्षित स्मारकांच्या संवर्धनासाठी ३ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

त्यानुसार नळदुर्ग किल्ल्यासाठी वर्ष २०२५-२६ मध्ये रुपये ४ कोटी ६१ लक्ष ९२ हजार २०४ रुपये इतक्या खर्चाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

**या अंतर्गत प्रस्तावित कामे पुढीलप्रमाणे आहेत :**

हत्तीखाना,प्रवेशद्वाराजवळील ओवऱ्या,कचेरी,मस्जिद, आदिलशाही मस्जिद,रंगमहाल, धान्य कोठार यांचे जतन व दुरुस्ती, इमारतींमधील भेगा व सांधे दुरुस्त करणे (ग्राऊटिंग),किल्ल्याच्या भिंतींची स्वच्छता व झाडेझुडपे काढणे,जुने प्लास्टर काढून नवीन चुन्याचे प्लास्टर,लाकडी व दगडी बांधकामांची दुरुस्ती व गळती प्रतिबंधक उपाय,उपळी बुरुजाच्या कमानींचे मजबुतीकरण,इतर पूरक कामे करणे आदी कामांचा समावेश आहे.या अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सध्या ई-निविदा प्रक्रिया सुरू आहे.निविदा प्रक्रिया पूर्ण होताच संबंधित कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे.

**ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी ठोस पावले :**

नळदुर्ग किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी शासनाने आखलेल्या या योजनांमुळे ऐतिहासिक वारशाचे संरक्षण होण्यास मोठी मदत होणार आहे.प्राचीन स्थापत्यकलेचा हा अद्वितीय नमुना पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.


**भुईकोट वैभवाची नवी उभारी :** परांडा किल्ल्याच्या जतन-संवर्धनासाठी ऐतिहासिक पुढाकार

परांडा तालुक्यातील परांडा किल्ला हा किल्ला धाराशिवपासून सुमारे ८० कि.मी.अंतरावर आहे.परांडा- करमाळा मार्गापासून अर्धा कि.मी.पश्चिमेस हा किल्ला स्थित आहे.किल्ल्याच्या भौगोलिक स्थानाचा विचार केल्यास सीना व दुधना या उपनद्यांच्या परिसरात परांडा शहर वसलेले आहे. दख्खनच्या राजकारणात या किल्ल्याचे महत्त्व विशेष होते. सोलापूरहून विजापूरपर्यंत प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी परांडा किल्ल्यावर प्रभुत्व आवश्यक मानले जात असे.त्यामुळे मध्ययुगीन काळात विविध सत्तांमध्ये या किल्ल्यासाठी संघर्ष झाल्याचे दिसून येते.

परांडा किल्ला हा मराठवाड्यातील एक महत्त्वाचा भुईकोट किल्ला असून आकाराने लहान असला तरी देखणा व बळकट आहे.विशेष म्हणजे,प्रत्यक्ष युद्धात फारसा सहभाग नसतानाही हा किल्ला मध्ययुगीन लष्करी स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखला जातो.

किल्ल्याचा तलविन्यास चौकोनी असून संरक्षणासाठी सर्व बाजूंनी खोल व भव्य खंदक खोदण्यात आलेला आहे.या खंदकात दोन विहिरीही आहेत. किल्ल्यास दुहेरी तटबंदी असून बाह्य तटबंदीला २६ तर आतील तटबंदीला १९ बुरुज आहेत.तटबंदीची रचना 'चिलखती' प्रकारातील असून त्यातील अंतर आवश्यकतेनुसार बदलते.मुख्य तटाभोवती असलेल्या दुसऱ्या तटाला 'शेरहाजी' असे संबोधले जात असे.

किल्ल्याच्या तटबंदीमधून खंदकात उतरण्यासाठी सात गुप्त मार्ग तयार करण्यात आले आहेत.खंदकावर झुलता पूल असून तो आवश्यकतेनुसार




काढता येण्याची सोय होती.किल्ल्याच्या अंतर्भागात नगारखाना,जामा मस्जिद, अंबरखाना,घोडपागा,हाथीखाना, हमामखाना,कचेरी,अष्टकोनी विहीर, दोन अन्य विहिरी,महादेव मंदिर, नरसिंह मंदिर तसेच दोन दर्गे आहेत. याशिवाय 'मलिक-ए-मैदान', 'अजदहा पईकर','बांगडी तोफ' यांसारख्या तोफा येथे पाहायला मिळतात.त्यामुळे हा किल्ला आकाराने लहान असला तरी लष्करी दृष्ट्या अत्यंत परिपूर्ण व आकर्षक आहे.पुढे स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत हा किल्ला निजामाच्या ताब्यात राहिला. निजाम शासनाने १२ जानेवारी १९५३ अधिसूचनेनुसार किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले होते.राज्य पुनर्रचनेनंतर हे स्मारक महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित झाले.

विभागीय निधीतून जतन-दुरुस्तीचा व्यापक आराखडा :

परांडा किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार,या स्मारकाचा 'महावारसा विशेष स्मारक योजना' अंतर्गत विकास आराखड्यात समावेश करण्यात आला आहे.

या कामासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी रुपये १० कोटी २२ लक्ष २७ हजार २५० रुपये इतक्या खर्चाचा सविस्तर अंदाजपत्रक तयार करून पुरातत्व विभागाने त्यांच्या मुख्यालयास सादर केले आहे.

**या आराखड्यातील प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे आहेत :**

स्मारक परिसरातील तसेच तटबंदीवर वाढलेली झाडेझुडपे काढणे.स्मारक परिसरात शास्त्रोक्त पद्धतीने उत्खनन करणे.मुख्य प्रवेशद्वारालगतच्या आतील व बाह्य भागातील क्षतीग्रस्त तटबंदीची दुरुस्ती करणे.तटबंदीच्या भिंतींना दर्जा भरणे.तटबंदीवरील क्षतीग्रस्त दगडी कंगोरे व तटबंदीलगत दगडी पाथवे तयार करणे.तटबंदीच्या भेगा पडलेल्या भिंतींना ग्राऊटिंग करणे. इतर अनुषंगिक कामे प्रस्तावित आहे.वरील सर्व बाबींचा समावेश असलेले अंदाजपत्रक प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस संचालनालयास सादर करण्यात आले आहे.

**वारसा जतनासाठी निर्णायक टप्पा :**

या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळताच निविदा प्रक्रिया राबवून किल्ल्याच्या जतन,दुरुस्ती व संवर्धनाच्या कामांना सुरुवात करण्यात येणार आहे.या उपक्रमामुळे परांडा किल्ल्याच्या ऐतिहासिक व स्थापत्यवैभवाचे जतन होऊन पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य वारसा अधिक भक्कमपणे उभा राहणार आहे.

**-संकलन**

**जिल्हा माहिती कार्यालय धाराशिव**

(स्रोत : सहाय्यक संचालक,पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर)

## ताप, खोकला, श्वास घेण्यास त्रास... हंता व्हायरसने घेतला ३ जणांचा बळी, 'ही' आहेत लक्षणं

**हंता** व्हायरसने संपूर्ण जगाचं टेन्शन वाढवलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) माहितीनुसार, या संसर्गामुळे आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू झाला आहे. बाधितांमध्ये ताप, पोटाच्या गंभीर समस्या, वेगाने पसरणारा न्यूमोनिया आणि 'एक्यूट रेस्पिरेटरी सिंड्रोम' यांसारखी लक्षणं दिसून आली आहेत. सध्या रुग्णांना आयसोलेशनमध्ये ठेवून त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. मात्र, हा व्हायरस माणसांपर्यंत पोहोचला कसा, हा मोठा प्रश्न आहे.

**हंता व्हायरस म्हणजे काय?**

हंता व्हायरस हा मुख्यत्वे उंदीर, खार यांसारख्या कुरतडणाऱ्या प्राण्यांची विष्ठा, लघवी किंवा लाळेच्या संपर्कात आल्यामुळे माणसांमध्ये पसरतो. हा व्हायरस एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे जाण्याचं प्रमाण अत्यंत दुर्मिळ आहे. १९९६ मध्ये 'अँडीज व्हायरस' (हंता व्हायरसचा एक प्रकार) मुळे माणसाकडून माणसाकडे संसर्ग झाल्याचं पहिलं प्रकरण समोर आलं होतं. क्रूझवर हा प्रसार नक्की कसा झाला, याचा शोध अजून सुरू आहे.

हंता व्हायरसची लक्षणं आणि सिंड्रोम

सीडीसीच्या (CDC) मते, या व्हायरसमुळे दोन प्रकारचे गंभीर सिंड्रोम होतात

हंता व्हायरस पल्मोनरी सिंड्रोम हा प्रकार फुफ्फुसांवर हल्ला करतो आणि जीवघेणा ठरू शकतो.

**सुरुवातीची लक्षणं** - थकवा, ताप, स्नायू दुखणं, डोकेदुखी, चक्कर येणं, थंडी वाजणं आणि पोटाचे विकार (उलट्या, जुलाब).

**गंभीर लक्षणं** - १० दिवसांनंतर खोकला आणि श्वास घेण्यास प्रचंड त्रास होतो. फुफ्फुसात पाणी साचल्यामुळे छातीत आकडल्यासारखं वाटते. या आजारात मृत्यूचं प्रमाण ३८% इतकं असू शकतं.

हेमोरेजिक फीवर विथ रेनल सिंड्रोम

हा आजार किडनीवर परिणाम करतो.

लक्षणं - डोकेदुखी, पाठ आणि पोटात दुखणं, ताप, अंधूक दिसणं, अंगावर लाल पुरळ येणं, लो ब्लड प्रेशर आणि रक्तस्राव. गंभीर परिस्थितीत किडनी निकामी होऊ शकतं. यामध्ये मृत्यूचं प्रमाण ५ ते १५ टक्के असते.



**उपचार पद्धती**

हंता व्हायरसवर अद्याप कोणताही ठोस किंवा निश्चित उपचार उपलब्ध नाही.

रुग्णाला 'सपोर्टिव्ह केअर' दिली जाते, म्हणजेच दिसणाऱ्या लक्षणांवर उपचार केले जातात.

रुग्णाला पुरेसा आराम आणि हायड्रेटेड राहण्याचा सल्ला दिला जातो.

फुफ्फुसांचा त्रास असल्यास 'इंट्यूबेशन' किंवा 'ब्रीदिंग सपोर्ट' दिला जातो. किडनीवर परिणाम झाल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यासाठी 'डायलिसिस'चा आधार घ्यावा लागतो.

२०२१च्या निवडणुकीत भाजपने ६० जागा जिंकल्या होत्या. आता पक्षाने त्यापुढे मजल मारली आहे. काँग्रेसने महाजोत आघाडी स्थापन केली, 'भारत जोडो' यात्रेचा फायदा होईल, ही अपेक्षा ठेवली. यापैकी कशाचाच उपयोग झाला नाही.

आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपने सलग तिसर्यांदा यश मिळविले. सत्तेत पुनरागमन करण्याचे काँग्रेसचे स्वप्न भंगले आहे. भाजपच्या विजयाचे श्रेय मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांना द्यावे लागेल. धार्मिक ध्रुवीकरणाचे समीकरण विस्कटणार नाही, यासाठी त्यांनी निकराचा प्रयत्न केला. त्यामुळे प्रस्थापित सत्तेबद्दल मतदारांच्या मनात असलेले कमी-अधिक असमाधान, हा घटक आपोआपच अदृश्य झाला! काँग्रेसला चितपट करून भाजपने आसामचे सिंहासन कायम राखले; पण पूर्वाश्रमीच्या काँग्रेसजनांच्या मदतीने! अर्थात, हिमंता बिस्वा यांची काँग्रेसमधील कारकीर्द हा केव्हाच इतिहास बनला आहे. आता ते भाजपसाठी देशपातळीवरील मुलुखमैदान तोफ आहेत. बाजूच्याच बंगालमध्ये विजय खेचून आणणारे सुवेंदू अधिकारी हेही मूळचे काँग्रेसचे.

प्रभावहीन ठरले. मियाँना, म्हणजेच बांगला देशातून आलेल्या मुस्लिमांना हाकलून देऊ, असे त्यांनी सातत्याने प्रचारसभांमधून सांगितले. भाजपचा कट्टर हिंदुत्ववादी चेहरा, ही बिस्वा यांची ओळख आसाममधील मतदारांनाही भावते, हा निकालाचा अर्थ. मदरशांवर निर्बंध, विधानसभेत नमाज पढण्याची मुभा बंद, आसाम मुस्लिम विवाह विधेयक, घुसखोरांवर कारवाई या बिस्वा यांच्या निर्णयांचे देशभर पडसाद उमटले; पण त्यांनी आपल्या पक्षाला सोयीची असलेली भूमिका बदलली नाही. जोपर्यंत सूर्य आणि चंद्र आहे तोपर्यंत भारत हिंदू राष्ट्र राहील, ही त्यांची आसाममध्ये 'हॅटट्रिक' साधल्यानंतरची प्रतिक्रिया आहे. गायक झुबीन गर्ग यांच्या मृत्यूचे राजकारण केल्याबद्दल मतदारांनी काँग्रेसला शिक्षा दिली, असे ते म्हणाले. धार्मिक आवाहन आसामच्या मतदारांना का आकर्षित

# बिस्वांचा विजय

आसाम विधानसभेच्या १२६ जागांपैकी भाजपने ८२ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला. काँग्रेसला अवघ्या १९ जागांवर समाधान मानावे लागले. प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई यांचा पराभव ही काँग्रेससाठी नामुष्की. जोरहाट मतदारसंघात भाजप नेते हितेंद्रनाथ गोस्वामी यांनी गोगोई यांचा २३ हजाराहून अधिक मतांनी पराभव केला. गोगोई यांच्या पराभवासाठी हिमंता बिस्वा यांनी कंबर कसली होती. काँग्रेसचे देवव्रत सैकिया, नंदिता दास, आसाम जातीय परिषदेचे लुरिंज्योती गोगोई, रंजन गोहेन अशा प्रमुख उमेदवारांसह त्यांच्या पक्षाला मतदारांनी नाकारले. काँग्रेसमधून अनेक नेते निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये आले. याचा काँग्रेसच्या नीतिधैर्यावर परिणाम झाला. भूपेन बोरा हे काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष. त्यांच्यासह कमलाख्या डे पूरकायस्थ, शशिकांत दास हे भाजपमध्ये नव्याने आलेले नेते विजयी झाले. भाजपची लाट आहे हे ओळखून योग्य व्यूहरचना आखण्यात काँग्रेसला अपयश आले. या निवडणुकीसाठी भाजपने ३१ कलमी संकल्प पत्र तयार केले होते. सत्तेत आल्यानंतर तीन महिन्यांत राज्यात समान नागरी कायदा लागू करणे, घुसखोरांची ओळख पटवून त्यांची बांगला देशात रवानगी करणे, गरजू कुटुंबांना आर्थिक मदत, महिलांना विशेष अनुदान याचा समावेश संकल्पपत्रात होता.

**हिंदुत्ववादी चेहरा**

बिस्वा यांनी आक्रमक प्रचार केला. त्यांच्या पत्नीवर पासपोर्ट संदर्भात आरोप झाले; पण ते

करते, याचा काँग्रेसने विचार करण्याची वेळ आली आहे. घुसखोर कोणत्याही धर्माचा असो, त्याचा धर्म न पाहता त्याची मायदेशी रवानगी होणे ही स्वाभाविक अपेक्षा म्हणता येईल. बांगला देशातील घुसखोरांमुळेच एकेकाळी आसाममध्ये युवकांचे विराट आंदोलन उभे राहिले आणि पुढे आसाम गण परिषदेकडे सत्तेची सूत्रे गेली, हा इतिहास फार जुना नाही. प्रश्न त्यातून बोध घेण्याचा आहे. यापुढच्या काळात राजकीय पटलावर तग धरायचा असेल, तर स्थानिक नागरिकांच्या भावनांना तडा जाईल, या पद्धतीची भूमिका काँग्रेसच काय, अन्य कोणत्याही राजकीय पक्षांना घेता येणार नाही. तरुण वर्गाला आपल्याबरोबर खेचण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर, चहाच्या मळ्यातील कामगारांना आपलेपणा वाटावा यासाठी प्रयत्न, शहरी मतदार आणि स्थानिक जमातींसह सर्व घटकांशी संवाद, ही बिस्वा यांची ताकद ठरली.

# आरोग्याचा सल्ला

मधुमेह म्हणजेच डायबेटीस हा आजार सध्या अतिशय सामान्य झाला आहे; परंतु याचे दुष्परिणाम खूप गंभीर असू शकतात. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहिली नाही, तर शरीरातील इतर अवयवांवर वाईट परिणाम होतो. बहुतेक घरगुती स्वयंपाकात आल्याचा वापर केला जातो. ते केवळ जेवणाची चवच वाढवत नाही, तर त्याचे आरोग्यदायी फायदेदेखील आहेत. आल्याचे पाणी मधुमेही रुग्णांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. आल्यातील जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. त्याव्यतिरिक्त आल्यातील जिंजरॉल, फायबर व कॅल्शियम हे घटक इतर अनेक आरोग्यदायी फायदे प्रदान करतात. मधुमेही रुग्णांनी आल्याचे पाणी कसे आणि केव्हा सेवन करावे ते पाहूया.

**मधुमेहींसाठी आल्याचे पाणी**

आल्याच्या पाण्यात झिंकचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे शरीरात इन्सुलिनचे उत्पादन वाढते, ज्यामुळे मधुमेहींच्या साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. आले हे कमी ग्लायसेमिक असलेले अन्न आहे, ज्यामुळे मधुमेहींना ते त्यांच्या आहारात समाविष्ट करणे सोपे होते.

**मधुमेहींनी आल्याचे पाणी कधी प्यावे?**

मधुमेहींनी दररोज आल्याचे पाणी प्यावे. त्यामुळे मधुमेहाची पातळी नियंत्रित राहण्यास आणि त्याची लक्षणे व्यवस्थापित करण्यास मदत होईल.

**पोटाच्या समस्यांसाठी**

दररोज आल्याचे पाणी प्यायल्याने पचन सुधारते. आल्याचे पाणी प्यायल्याने काही दिवसांतच पोटाच्या सर्व समस्या दूर होण्यास मदत होते. त्यामुळे छातीत जळजळ कमी होण्यासदेखील मदत होते.

**चरबी जाळते**

आल्याचे पाणी प्यायल्याने शरीरातील चरबी जाळण्यास मदत होते. त्यामुळे वजन नियंत्रित राहण्यासही मदत होते. म्हणून दररोज आल्याचे पाणी प्या. त्यामुळे स्नायूंना टोन होण्यासही मदत होते.

**उलट्या आणि मळमळ कमी करते**

उलट्या किंवा मळमळ होत असताना आल्याचे पाणी प्यायल्याने त्वरित आराम मिळतो. हे मॉर्निंग सिकनेसमध्येदेखील मदत करते.

**मासिक पाळीच्या वेदना कमी करते**

आल्याचे पाणी प्यायल्याने मासिक पाळीच्या वेदना कमी होतात आणि पोट व स्नायूंमध्ये पेटके कमी होतात. म्हणून जेव्हा जेव्हा तुम्हाला वेदना जाणवतील तेव्हा आल्याचे पाणी नक्की प्या.

**सावधान! केवळ महिलांनाच नाही तर पुरुषांनासुद्धा होतो स्तनाचा कर्करोग; ही लक्षणं दिसताच बाळगा सावधगिरी**

स्तनाचा कर्करोग फक्त महिलांना होतो? तुम्ही देखील या भ्रमात आहात काय? मात्र, हे खरं नाही. हा फक्त गैरसमज आहे. पुरुषांनाही स्तनाचा कर्करोग होऊ शकतो. हा आजार लिंग किंवा वयानुसार भेदभाव करत नाही. अलिकडेच, एक अशी घटना समोर आली ज्याने सर्वांनाच धक्का बसला. यावरून हे स्पष्ट होते की स्तनाचा कर्करोग केवळ महिलांनाच नाही तर पुरुषांनाही होऊ शकतो. यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन (सीडीसी) नुसार, अमेरिकेत स्तनाच्या कर्करोगाच्या १०० रूग्णांमागे एक पुरुष रुग्ण आढळतो. ४२ वर्षीय शेफ मॅट केली अलीकडील उदाहरण: ४२ वर्षीय शेफ, मॅट केली याचे अलीकडील उदाहरण आहे. शेफ मॅट केली पूर्णपणे निरोगी जीवन जगत होते. मात्र, ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांच्या छातीत एक गाठ जाणवली. सुरुवातीला त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं, परंतु पत्नीच्या आग्रहावरून ते डॉक्टरकडे गेले. तपासणीदरम्यान काही चाचण्यांवरून असं दिसून आलं की, त्यांना स्तनाचा कर्करोगाचा एक आक्रमक प्रकार आहे. जो त्यांच्या लिम्फ नोड्सपासून त्यांच्या हाडांपर्यंत पसरला होता.

शेफ मॅट केली यांचे प्रकरण पुरुषांच्या स्तनाच्या कर्करोगाबद्दल जागरूकता वाढविण्याशी संबंधित आहे. ही घटना अधोरेखित करते की, पुरुषांनाही या आजाराची लागण होऊ शकते. मॅट यांच्या उदाहरणावरून लक्षात येते की, हा आजार लिंग, वयावर अवलंबून नाही. भारतात पुरुषांमध्ये अशाच प्रकारची प्रकरणे नोंदवली गेली आहेत, परंतु त्याबद्दल जागरूकता कमी आहे.

डॉक्टर म्हणतात की जर त्वरित उपचार केले तर जीव वाचवता येतो, परंतु जर दुर्लक्ष केले तर हा आजार शरीराच्या प्रत्येक भागात पसरू शकतो. पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाची लक्षणं जाणून घेऊया.

पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे

छातीत किंवा काखेत लहान गाठ

स्तनाग्रातून स्राव (कधीकधी रक्तासह)

त्वचेचा रंगात किंवा आकार बदलणे (ही सर्व सुरुवातीची लक्षणे आहेत)

कधीकधी छातीत दुखणे, सूज येणे किंवा जखमा होऊ शकतात.

अमेरिकन कॅन्सर सोसायटी (अएए) नुसार, पुरुषांमध्ये हा आजार अनेकदा हळूवारपणे वाढतो. वर नमूद केल्याप्रमाणे, पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाच्या लक्षणांमध्ये स्तनात गाठी, वेदना, स्तनाग्रातून स्राव आणि स्तनाग्राच्या आकारात किंवा पोत बदल यांचा समावेश आहे. या लक्षणांचे लवकर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण वेळेवर उपचार केल्यास बरे होण्याची शक्यता वाढते. सामाजिक कलंक आणि लाजिरवाण्या भावनांमुळे, पुरुष अनेकदा या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात, जे नंतर घातक ठरू शकते.

४० वर्षांनंतर चाचणी आवश्यक: बहुतेक पुरुषांना वाटते की, स्तनाचा कर्करोग हा फक्त महिलांना होणारा आजार आहे, म्हणून ते त्याकडे दुर्लक्ष करतात. परंतु, पुरुषांमध्येही स्तनाच्या ऊतींचे प्रमाण कमी असते आणि कर्करोगाच्या पेशी तिथे देखील विकसित होऊ शकतात. जरी याचे प्रमाण कमी असले तरी त्याची तीव्रता कमी नाही. विशेषत: ४० वर्षांनंतर, जर तुम्हाला तुमच्या छातीभोवती गाठ, त्वचा घट्ट होणे किंवा स्तनाग्रांच्या आकारात बदल दिसला तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. ताबडतोब चाचणी आवश्यक औषधं घेणं गरजेचं आहे.

# इलेक्ट्रिक वाहनांना वाढली मागणी

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतात इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) मागणीत लक्षणीय वाढ होत आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे इंधनाच्या उपलब्धतेबाबत आणि किमतीतील संभाव्य वाढीबाबत ग्राहकांमध्ये चिंता आहे. त्यामुळे भारतीय ग्राहक आता पेट्रोल-डिझेल वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांना अधिक प्राधान्य देत आहेत. 'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशन' (फाडा) ने 'वाहन' पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे दिलेल्या माहितीनुसार, नवीन मोटार विक्रीत इलेक्ट्रिक वाहनांचा वाटा फेब्रुवारीतील ३.५ टक्क्यांवरून वाढून मार्चमध्ये ५.१ टक्क्यांवर पोहोचला आहे. यामुळे 'ईव्ही' प्रकारात सातत्याने वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'टाटा मोटर्स' च्या प्रवासी वाहन विभागाचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा यांनी सांगितले, की इंधनाच्या किमती आणि उपलब्धतेबाबत असलेली अनिश्चितता ही ग्राहकांच्या



निर्णयावर प्रभाव टाकत आहे. त्यांच्या मते, गेल्या महिन्यात कंपनीच्या इलेक्ट्रिक मोटारीच्या मागणीत सुमारे २० ते ३० टक्क्यांची वाढ झाली आहे आणि यामागे पश्चिम आशियातील परिस्थितीबाबतची चिंता कारण आहे.

'जेएसडबल्यू एमजी मोटर इंडिया'चे व्यवस्थापकीय संचालक अनुराग मेहरोत्रा यांनीही हीच बाब अधोरेखित केली. त्यांनी सांगितले, की सध्या शोरूममध्ये येणारे ग्राहक इलेक्ट्रिक वाहनांना पहिली पसंती देत आहेत. जे ग्राहक आधी निर्णय घेण्यात संकोच करत होते, तेदेखील आता वेगाने 'ईव्ही' पर्याय स्वीकारत आहेत. मार्च महिन्यात कंपनीने ग्राहकांच्या पसंतीत २६ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. या वाढीमागील एक महत्त्वाचा घटक म्हणजे होर्मुज सामुद्रधुनीतील अडथळे. हा मार्ग जगातील कच्चे तेल आणि लिक्विफाइड नॅचरल गॅस (एलएनजी) वाहतुकीसाठी महत्त्वाचा आहे. या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय ग्राहकांना अधिक सुरक्षित आणि किफायतशीर वाटत आहे. 'जेएसडबल्यू एमजी मोटर इंडिया कंपनी'ने आपल्या 'न्यू एनर्जी' वाहनांच्या पोर्टफोलिओचा विस्तार, उत्पादन क्षमता वाढवणे, स्थानिकीकरणाला चालना देणे आणि चार्जिंग सुविधांचा विकास करण्याची योजना आखली आहे. जागतिक स्तरावरही अशीच स्थिती असून, युरोप आणि अमेरिकेसारख्या बाजारपेठांमध्ये पेट्रोलच्या वाढत्या किमतीमुळे इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



कोणत्याही रिलेशनमध्ये शारीरिक संबंधासाठी पुढाकार पुरुष अधिक करतात. हे प्रमाण तीनपट अधिक असल्याचे एका शोधात कळू आले आहे. शोधकर्त्यांनी सांगितले की लॉग टर्म रिलेशनशिपमध्ये जोडप्यांमध्ये इंटिमेट होण्याचे किती महत्त्व आहे. हैराण करणारे आकडे म्हणजे खूप काळापासून सोबत असलेल्या कपल्सवर करण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये ते एकमेकांपासून खूश नाही असे कळून आले. शोधाप्रमाणे कोणत्याही नात्यात किती वेळा संबंध स्थापित करायचे यासाठी उत्कटता महत्त्वाची आहे. यात तरुणांना सामील करण्यात आले आणि विचारण्यात आले की ते आपल्या रिलेशनमध्ये कितपत खूश आहे किंवा पार्टनरशी किती जुळले आहेत. त्यांच्या किती प्रेम आणि विश्वास टिकलेला आहे.

## २ Joke विनोद




एक मुलगा देवाला प्रार्थना करीत असतो, ङ्गदेवा मला खूप मोठा कर. नाही जमलं तरी प्रयत्न कर. कारण प्रत्येकजण मला सांगत असतो की ङ्गप्रयत्नांती परमेश्वरफ कधी तरी तुला यश येईल.फ्फ

## ३ Message संदेश



Pucha mujhse chand sitaro ne,
tuje bhula diya kya tere jigari yaro ne,
maine kaha, bhul to nhi skte,
bas lage honge kamine kisi ko patane me.

## ४ Thought सुविचार




चंद्र आणि चंदनापेक्षा सज्जनांचा सहवास शीतल असतो.
अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।**
**सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम॥**

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. सवड
४. नाणेफेक
८. टेचात, थाटामाटात
११. सैन्याचा मालपुरवठा
१३. घासात बारीक खडे यावेत तशी तापदायक बडबड
१६. खास खबर
१९. बेताचे गरम
२०. घाटा
२१. गोडी, आवड
२३. पदार्थ शिजतानाचा आवाज
२५. अंधार
२७. चामखीळ
२९. वास्तव्य, अस्तित्व
३०. सत्व
३१. चाकोरीसाठी मराठीत रूळलेली इंग्रजी शब्द
३३. उपहास
३४. विनाप्रयत्ने, सहजगत्या
३६. अपशकुन
३८. सरस-निरस (भाव)
४०. भारवाहक
४१. रानटी, जंगलातील
४२. अगदी दूर, पलीकडे
४५. श्रवणाचा अवयव
४८. वेळ घालविणे
४९. झोपाळा
५०. तमाशातील कलाकार
५३. पाढ्यांची उजळणी
५४. शिव्यशाप
५७. उंचसखल नसलेले
५८. सूर्याचे एक नाव
६०. भेग, चीर
६१. काठाकाठाने
६३. धावपळ, भीतीने पांगापांग
६५. शर्त, पण
६६. बटवा
६८. लव्ह लेटर पण मराठीत
७०. राजाची मुलगी
७२. कोलकताचे विमानतळ
७४. घट्ट, तणावपूर्ण
७५. सर्दीने बंद होणारे
७६. कलावंत
७९. धुंदी, कैफ
८३. पत्रातील सा.न.वि.वि.

### उभे शब्द

१. स्फुरण (पावणे)
२. फळातील द्रव
३. घर, निवास
५. शेराचा चौथा भाग
६. बिशाद, हिंमत
७. रोख पैसा, रोकड
९. कारभार, कामगिरी (हिंदी)
१०. घेराव, गराडा
१२. गहन
१४. डोईवरचा पूर्ण चंद्र!
१५. जिभेचे चोचले पुरवणारे
१७. आशीर्वाद
१८. क्रिकेटमधील सहा
२०अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
२२. अगदी सारखे
२४. जीभ
२६. बोरबरी
२८. मजेसाठी पर्यटन
२९. गाईचे पिल
२९अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
३२. पुरुष
३५. प्राण
३७. पत्र, डाक
३९. न्यारी, रीत!
४०. उचलबांगडी
४३. गूढ
४४. शंकराने धारण केलेल विष
४६. वर्तमानपत्र (हिंदी)
४७. स्वरांचे शास्त्र व कला
४८. पाणी वाढण्याचे भांडे
५०. काव्यात तुझे
५१. गोंधळ, थट्टा, भांडण
५२. समोर (हिंदी)
५५. काठ, किनारा
५६. बोटांनी दारावर आवाज
५७. रोखठोक, स्पष्ट
५९. कोयत्याचा साथीदार
६२. धमकी
६४. खाट, बाज
६५. बोकड
६६. नरमच्या विरुद्ध
६७. चार वेदांपैकी एक
६८. कधी रसिक, कधी बघ्या
७०. राधाकृष्ण (हिंदी)
७१. समतोल बुद्धीचा
७३. मज्जाव, बंदी
७७. लग्नाचे पारंपारिक मिष्टान्न
७८. पृथ्वी
७९. जोगीण (इंग्रजी)
८०. भारताचा राष्ट्रीय पक्षी
८१. पांडवांची आई
८२. पहिली रास

### आडवे उत्तरे

१.करवत ४.छापाकाटा ८.झकपक ११.रसद १३.कचकच १६.नवलविशेष १९.कोमट २०.तूट २१.रस २३.रटरट २५.तमस २७.मस २९.वास ३०.कस ३१.रूटीन ३३.टर ३४.सहजासहजी ३६.नाट ३८.तरतम ४०.हमाल ४१.वन्य ४२.पार ४५.कान ४८.कालहरण ४९.झूला ५०.तमासगीर ५३.परवचा ५४.तळतळाट ५७.समतल ५८.रम ६०.फट ६१.कडेकडेने ६३.पळापळ ६५.अट ६६.कसा ६८.प्रेमपत्र ७०.राजकन्या ७२.डमडम ७४.तंग ७५.नाक ७६.कलाकार ७९.नशा ८३.साष्टांग नमस्कार विनंती विशेष

### उभे उत्तरे

१.फुरफुर २.रस ३.वदन ५.पावशेर ६.टाप ७.रकम ९.करतूत १०.कडे १२.खोल १४.चकोट १५.चटपटीत १७.वर १८.षटक २०अ.टमटम २२.समसमान २४.रसना २६.टर २८.सहल २९.वासरु २९अ.सह ३२.नर ३५.जीव ३७.टपाल ३९.तऱ्हा ४०.हकालपट्टी ४३.रहस्य ४४.हलाहल ४६.समाचारपत्र ४७.संगीत ४८.कावळा ५०.तव ५१.रळफळ ५२.सामने ५५.तट ५६.टकटक ५७.सडेतोड ५९.मळा ६२.दम ६४.पलंग ६५.अज ६६.कडक ६७.साम ६८.प्रेक्षक ७०.राधेशाम ७१.न्यायी ७३.मना ७७.लाडू ७८.रसा ७९.नन ८०.मोर ८१.कुंती ८२.मेष



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकची टीम भारतात येणार? सरकारची नवी पॉलिसी!

मुंबई–पाकिस्तानसोबतचे भारताचे संबंध मागच्या वर्षभरापासून आणखी खराब झाले आहेत. या कारणामुळे दोन्ही देशांमधल्या क्रिकेट टीममध्येही बरेच वाद होत आहेत. मागच्या काही वर्षांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय सीरिज होत नाहीत, तसंच टीम इंडियादेखील पाकिस्तानमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळण्यासाठी जात नाही. यातच आता भारताच्या क्रीडा मंत्रालयाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाच्या नव्या पॉलिसीनुसार पाकिस्तानी खेळाडूंना भारतात येण्याची परवानगी देण्यात आली आहे. भारतात होणाऱ्या इंटरनॅशनल इव्हेंट्ससाठी इतर देशांच्या खेळाडूंप्रमाणेच पाकिस्तानी खेळाडू सहभागी होऊ शकतात.

भारत सरकारची भूमिका काय?

मपाकिस्तानी खेळाडू अशा इव्हेंट्समध्ये सहभागी होऊ शकतात, ज्याचं आयोजन भारतात होणार आहे, पण भारतीय टीम पाकिस्तानमध्ये जाणार नाहीफ, अशी भूमिका भारत सरकारने मांडली आहे. म्हणजेच भारतामध्ये आशिया कप आणि वर्ल्ड कपसारख्या स्पर्धा होत असतील तर पाकिस्तानी खेळाडूंना भारतात यायची परवानगी असेल, पण दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय सीरिज होणार नाही.

### राष्ट्रीय स्पर्धेत कबड्डी, खो-खो मध्ये राजस्थानची आगेकूच

पुणे–एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४५ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत बुधवारी (दि.६) झालेल्या चुरशीच्या साखळी सामन्यांमध्ये महावितरणच्या पुरुष व महिला संघाने प्रतिस्पर्धी संघावर सहज विजय मिळवला. तर खो–खोमध्ये महावितरणच्या पुरुष संघासह राजस्थानच्या महिला व पुरुष संघाने आगेकूच केली आहे.


बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आज पहिल्या सत्रात कबड्डी, खो–खोचे साखळी सामने झाले. कबड्डीच्या सामन्यांमध्ये महापारेषण संघाने मध्यप्रदेशच्या एमपी पॉवर संघाचा ३ गुणांनी पराभव केला. तर महावितरणने एकतर्फी वर्चस्व गाजवत महानिर्मिती संघाचा २६ गुणांनी पराभव केला. पंजाब पॉवरने उत्तराखंडच्या पॉवर ट्रान्समिशन कंपनीचा १७ गुणांनी आणि हरियाणा संघाने गुजरात संघाचा ३० गुणांनी पराभव केला. कबड्डीच्या महिला गटात हिमाचल प्रदेशने महापारेषण संघाचा ३२ गुणांनी तर महावितरणने हरियाणा पॉवर संघाचा ४८ गुणांनी एकतर्फी पराभव केला. खो खोच्या महिला गटात राजस्थान संघाने गुजरात ऊर्जा विकास निगम संघाचा पराभव केला.

### मुंबई इंडियन्सच्या अडचणीत वाढ, हार्दिक पांड्यानंतर सूर्यकुमार यादव संघाबाहेर?

मुंबई–आयपीएलच्या १९ व्या हंगामात मुंबई इंडियन्सची कामगिरी निराशाजनक राहिलेली आहे. रोहित शर्माच्या कमबॅकनंतर मुंबई इंडियन्स विजय मिळवला. मात्र, मुंबई गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. हार्दिक पांड्या आजारी असल्यानं लखनौ विरूद्धच्या सामन्यात खेळू शकला नव्हता. हार्दिक पांड्या दुखापतीमुळं बरा नसल्यानं त्याच्या जागी सूर्यकुमार यादवला कर्णधारपद देण्यात आलं होतं. मात्र, सूर्यकुमार यादव आरसीबी विरूद्धच्या सामन्यात खेळणार की नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. त्यामुळं मुंबईचं कर्णधारपद पुन्हा रोहित शर्माला दिलं जाणार की जसप्रीत बुमराह आणि तिलक वर्मा यांच्या नावांचा विचार केला जणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

एकीकडे आयपीएलमध्ये होत असलेले पराभव आणि दुसरीकडे हार्दिक पांड्या दुखापतीमुळं संघाबाहेर आहे. तो पुढील सामना देखील खेळण्याची शक्यता कमी आहे. सूर्यकुमार यादव देखील आरसीबी विरुद्धच्या सामन्यात प्लेईंग इलेव्हनचा सदस्य नसेल अशी चर्चा आहे.

## पराभवाचे खापर या खेळाडूंवर! सतत तिसऱ्या पराभवानंतर श्रेयसचा संताप



**नवी दिल्ली:** सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सला ३३ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला आहे. या पराभवानंतर बोलताना श्रेयस अय्यर काय म्हणाला? जाणून घ्या.

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात सण सनरायझर्स हैदराबाद आणि पंजाब किंग्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना हैदराबादच्या फलंदाजांनी तुफान फटकेबाजी केली. हेनेरिक क्लासेन आणि इशान किशनच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या बळावर हैदराबादने २३५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पंजाबकडून कुपर कॉनोलीने शतकी खेळी केली. पण पंजाबचा संघ विजयापासून ३३ धावा दूर राहिला. दरम्यान लागोपाठ तिसऱ्या पराभवानंतर कर्णधार श्रेयस अय्यर काय म्हणाला? जाणून घ्या.

पंजाब किंग्सचा संघ आतापर्यंत अव्वल स्थानी होता. पण लागोपाठ ३ सामने गमावल्यानंतर पंजाबला आपलं नंबर १ स्थान गमवावं लागलं आहे. दरम्यान या पराभवानंतर बोलताना श्रेयस अय्यर म्हणाला, ङ्कहे जरा जास्त झालं. आम्ही सुरुवातीलाच खूप झेल सोडले. सामना जसा पुढे गेला तशी खेळपट्टी स्लो होत गेली. सनरायझर्स हैदराबादच्या खेळाडूंनी उत्तम खेळ केला. त्यांनी आम्हाला दाखवून दिलं की, सामना कसा जिंकला जातो. आमची या स्पर्धेतील सुरुवात एखाद्या स्वप्नासारखी होती. आम्ही मजबूत स्थितीत होतो. पण असंच खेळत राहिलो, तर यात आमचा काहीच फायदा नाही.पंजाबचा फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहलने अनेकदा विकेटची संधी निर्माण करून दिली होती. पण त्याला क्षेत्ररक्षकांकडून हवी तशी साथ मिळाली नाही. याबाबत बोलताना श्रेयस अय्यर म्हणाला, ङ्कचहलने निडर होऊन गोलंदाजी केली. मी त्याला आधीच सांगितलं होतं की, तू आक्रमक गोलंदाजी कर. प्रामुख्याने तेव्हा, जेव्हा नवीन फलंदाज खेळपट्टीवर असेल. पण आमचं नशीब फुटकं.. आम्ही झेल पकडू शकलो नाही.या सामन्यात हैदराबादचा संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादकडून हेनरिक क्लासेनने सर्वाधिक ६९ धावांची खेळी केली. तर इशान किशनने ५५ धावांचे योगदान दिले. अभिषेक शर्माने ताबडतोड ३५ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर हैदराबादने २० षटकांअखेर ४ गडी बाद २३५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पंजाबकडून कुपर कॉनोलीने नाबाद १०७ धावांची खेळी केली. पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाची साथ मिळाली नाही. पंजाबचा संघ विजयापासून ३३ धावा दूर राहिला.

## कुपर कॉनोलीने पहिल्या शतकासह इतिहास घडवला!

### अशी कामगिरी



उेशिी उेपेश्रश्र्‌ कींपवीशव: पंजाब किंग्सचा स्टार फलंदाज कुपर कॉनोलीने हैदराबादविरूद्ध शतक झळकावलं. या शतकी खेळीसह त्याने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

पंजाब किंग्स संघाला आयपीएल २०२६ मध्ये सलग तिसऱ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. सनरायझर्स हैदराबादकडून पंजाबचा ३३ धावांनी पराभव करत मागील पराभवाचा बदला घेतला. यासह आता पहिल्या स्थानी असणारा पंजाबचा संघ दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. पंजाब किंग्ससाठी अखेरच्या चेंडूपर्यंत एकटा कुपर कॉनोली लढत होता, यादरम्यान त्याने शतक खेळीही केली. या शतकाच्या बळावर त्याने मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे. कुपर कॉनोलीने एका टोकाकडून विकेट्स पडत असताना एकट्याने झुंज देत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान त्याने टी–२० कारकिर्दीतील त्याचं पहिलं शतक झळकावलं. हैदराबादने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबची सुरूवात खूप खराब झाली आणि परिणामी संघाला ३३ धावांनी पराभवाला सामोर जावं लागलं.

कूपर कॉनोलीने एक शानदार खेळी केली. त्याने ५९ चेंडूंमध्ये सात चौकार आणि आठ षटकारांसह नाबाद १०७ धावा केल्या. त्याचा स्ट्राईक रेट १८१.३५ होता. कूपर कॉनोलीने हे शतक अवघ्या २२ वर्षे आणि २५७ दिवसांच्या वयात पूर्ण केलं, ज्यामुळे तो आयपीएलच्या इतिहासात शतक करणारा सर्वात तरुण विदेशी खेळाडू ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम क्विंटन डी कॉकच्या नावावर होता, ज्याने वयाच्या २३ वर्षे आणि १२२ दिवसांत हा पराक्रम केला होता.

आयपीएलमध्ये शतक झळकावणारा सर्वात तरुण विदेशी खेळाडू

२२ वर्षे २५७ दिवस – कूपर कॉनोली

२३ वर्षे १२२ दिवस – क्विंटन डी कॉक

२३ वर्षे १५३ दिवस – डेव्हिड वॉर्नर₹ली२३ वर्षे ३३० दिवस – डेव्हिड मिलर२३ वर्षे ३५२ दिवस – कॅमेरॉन ग्रीन

वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास; भारतीय क्रिकेटवर शोककळा

२२ वर्षीय कूपर कॉनोलीने आयपीएल २०२६ मध्ये आपला चांगला फॉर्म कायम ठेवला आहे. तो सध्या या हंगामात पंजाबचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याने १० सामन्यांमध्ये ५३.८६ च्या सरासरीने ३७७ धावा केल्या आहेत, ज्यात दोन अर्धशतकं आणि एका शतकाचा समावेश आहे. विशेष म्हणजे, त्याचा स्ट्राइक रेट १७१.३६ आहे, म्हणजेच तो प्रत्येक सामन्यात वेगाने धावा करत आहे. यापूर्वी त्याने लखनौविरुद्ध ८७ धावांची दमदार खेळी केली होती.



## कधी होणार भारत : पाकिस्तान क्रिकेट सामना ?

भारत पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामने बघण्यासाठी मोठ्या संख्येने प्रेक्षक येतात. स्टेडियम हाऊसफुल होते. टीव्ही, ओटीटी प्लॅटफॉर्म या दोन्ही ठिकाणी सामना बघण्यासाठी कोट्यवधी प्रेक्षक येतात. यामुळे मागील काही वर्षांपासून बंद असलेल्या भारत – पाकिस्तान मालिका पुन्हा सुरू होणार का ? यावरून क्रीडाप्रेमींमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने धोरण स्पष्ट केले आहे. पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाचा पुरस्कार करणे तसेच दहशतवादी कारवायांना प्रत्यक्ष – अप्रत्यक्षरित्या मदत करणे थांबवत नाही तोपर्यंत पाकिस्तानसोबत कोणत्याही प्रकारच्या क्रिकेट मालिकेत भारत खेळणार नाही. पण आयसीसीच्या बहुराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तान सहभागी असला तरीही भारत खेळेल. क्रीडा मंत्रालयाने ऑगस्ट २०२५ मध्ये जाहीर केलेले हे धोरण कायम असल्याचे जाहीर केले आहे.

भारताला भविष्यात मोठ्या जागतिक क्रीडा स्पर्धांचे यजमानपद भूषवायचे आहे आणि त्यासाठी आंतरराष्ट्रीय नियम, संकेतांचे पालन करणे आवश्यक आहे. यामुळेच आयसीसीच्या बहुराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तान सहभागी असला तरीही भारत खेळेल. पण इतर कोणत्याही स्पर्धेत भारत पाकिस्तान विरोधात क्रिकेट खेळणार नाही अशी भारताची अधिकृत भूमिका आहे. या भूमिकेत तसूभरही बदल केला नसल्याचा पुनरुच्चार देशाच्या क्रीडा मंत्रालयाच्यावतीने करण्यात आला आहे.

ऑगस्ट २०२५ मध्ये यूएई येथे आशिया कप स्पर्धेत भारत – पाकिस्तान खेळणार की नाही यावरून वाद झाला, त्यावेळी पाकिस्तान पुरस्कृत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा संदर्भ देत देशाच्या क्रीडा मंत्रालयाने धोरण जाहीर केले. हेच धोरण क्रीडा मंत्रालयाने कायम ठेवले आहे. भारत २०३० च्या राष्ट्रकुल आणि २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेच्या यजमानपदासाठी प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांमध्ये अडथळा निर्माण होऊ नये यासाठीच आयसीसीच्या स्पर्धेत पाकिस्तान सहभागी असला तरीही खेळू पण इतरत्र पाकिस्तान विरोधात खेळणार नसल्याचे क्रीडा मंत्रालयाने जाहीर केले आहे. भारत सरकारच्या या ठाम भूमिकेमुळे सध्या तरी भारत आणि पाकिस्तानमध्ये द्विपक्षीय मालिकेची कोणतीही शक्यता नाही, परंतु आयसीसी (खउउ) किंवा इतर बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सामने

## प्लेऑफचे ठिकाण झाले पक्के ; बीसीसीआयची मोठी अपडेट

मुंबई–आयपीएल २०२६ आता अखेरच्या टप्प्यात आहे. हंगामातील अखेरचा साखळी सामना २४ मे ला खेळला जाणारा आहे, तर आता बीसीसीआयकडुन महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. २०२६ चा फइनल सामना बेंगळुरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियम ऐवजी अहमदाबादच्या नेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणर आहे. आयपीएल २०२६ च्या प्लेऑफची सुरुवात २६ मे पासून होणार आहे.आयपीएल २०२५ च्या फाइनलमध्ये बेंगळुरुने पंजाबचा सहा धावांनी पराभाव करत पहिल्यांदा आयपीएलचे विजेतापद झळकवले होते. यामुळे आयपीएलच्या नियमानुसार गतविजेत्या टीमच्या घरच्या मैदानावर पुढच्या हंगामाचा अंतिम सामना खेळला जाईल, मात्र असं आता होणार नाही. यामुळे क्रिकेट वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.बेंगळुरुत सामना का नाही होणार ?आयपीएलच्या नियमानुसार अंतिम सामना बेंगळुरुत खेळला जाणार होता.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने याबद्दल एक निवेदन दिले असून त्यामध्ये म्हटले, अंतिम सामना आयोजित करण्याची जबाबदारी बंगळुरुवर सोपवण्यात आली होती, पण स्थानिक संघटना आणि प्रशासकीय यंत्रणांकडून करण्यात आलेल्या मागण्या, या बीसीसीआयच्या नियमावलीच्या बाहेर होत्या ,त्यामुळे अंतिम सामन्याचे ठिकाण बदलण्यात आले आहे.अंतिम सामन्याचे ठिकाण बद्दलण्याचे प्रमुख कारण आमदारांचा तिकिट वाद मानले जात आहे.

आयपीएल २०२६ सुरु होण्यापूर्वी कर्नाटकाच्या आमदाराने मागणी केली होती, की आमदार हा लोकप्रतिनिधी असुन त्यांना तिकीटांसाठी रांगेत थांबवे लागु नये, यासाठी प्रत्येक आमदाराला अंतिम सामन्याची किमान पाच तिकीटं मिळावीत. या प्रकरणाची दखल घेत कर्नाटकाचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या प्रत्येक सामन्याची तीन तिकीटे देणार असे जाहीर केले होते , म्हणून आता चिन्नास्वामी स्टेडियामवर अंतिम सामना होणार नसल्याचे बीसीसीआयने जाहीर केले.आयपीएल २०२६ अंतिम सामना आणि प्लेऑफ सामन्यांचे वेळापत्रक– क्वालिफायर १ – २६ मे २०२६, धर्मशाला एलिमिनेटर – २७ मे २०२६, चंदीगड क्वालिफायर २ – २९ मे २०२६, चंदीगड अंतिम सामना

## क्षेत्ररक्षणातला ढिसाळपणा भोवला, पंजाब किंग्सचा पराभव; सनरायझर्स हैदराबादचा विजय

पंजाबने हैदराबादला अव्वल स्थान केले बहाल

नवी दिल्ली : भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाटला उत्तेजक चाचणी देण्यासाठी गैरहजर राहिल्याप्रकरणी इंटरनॅशन टेस्टिंग एजन्सी (आंतरराष्ट्रीय चाचणी एजन्सी) …

पंजाब किंग्जच्या गचाळ क्षेत्ररक्षणाचा फायदा हैदराबादच्या फलंदाजांनी पुरेपूर उचलला. तीन सोपे झेल व एक स्टम्पिंग गमावल्याचा पंजाबला संपूर्ण सामन्यात पश्चाताप झाला. अभिषेक शर्माने १३ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ३५ धावांची आक्रमक खेळी केली आणि त्याला ट्रॅव्हिस हेड ( १९ चेंडूंत ३८ धावा) याची साथ मिळाली. दोन्ही सलामीवीर माघारी परतल्यानंतर पंजाबला डोकं वर काढण्याची संधी होती, परंतु शशांक सिंग, कूपर कॉनली व ल्युकी फर्ग्युसन यांनी सोपे झेल टाकले. मिळालेल्या संधीचं सोनं करताना इशानने ३२ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ५५ धावा केल्या. इशान व हेनरिच क्लासन यांनी ४८ चेंडूंत ८८ धावांची भागीदारी केली.

क्लासनने मोर्चा सांभाळताना ४३ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ६९ धावा केल्या, त्याच्यासोबत नितीश कुमार रेड्डीने ३२ चेंडूंत ६३ धावा जोडल्या. नितीश १३ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह २९ धावांवर नाबाद राहिला आणि हैदराबाद ४ बाद



२३५ धावांपर्यंत पोहोचला. पंजाबने या पर्वात पाच सामने लक्ष्याचा पाठलाग करताना जिंकले असले तरी हैदराबादने १० वेळा २२० हून अधिक धावा केल्या आणि त्यांना एकही हार पत्करावी लागली नाही. आजच्या डावात डठक ने मारलेले १७ षटकार ही देखील झइघड विरुद्ध त्यांची सर्वाधिक संख्या आहे. पंजाब किंग्जची सुरुवात काही खास झाली नाही आणि प्रियांश आर्य ( १) व प्रभसिमरन सिंग ( ३) हे दोन्ही सलामीवीर अनुक्रमे इशान मलिंगा व पॅट कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाले. हैदराबादच्या क्षेत्ररक्षकांनी सुरेख झेल टिपले. श्रेयस अय्यरही ( ५) स्वस्तात माघारी परतल्यानं पंजाबची अवस्था ३ बाद २३ अशी झालेली. मार्कस स्टॉयनिस व कूपर कॉनली यांनी ४० धावांची भागीदारी करून पंजाबचा डाव सावरला होता. पण, शिवांग कुमारने ही जोडी तोडली. स्टॉयनिस १४ चेंडूंत २८ धावांवर बाद झाला. पंजाबला १० षटकांत ४ बाद ९१ धावा करता आल्या होत्या आणि त्यांना ६० चेंडूंत १४५ धावा करायच्या होत्या. सूर्यांश शेडगेला ( २५) आज मोठी खेळी करून मैदान गाजवण्याची संधी होती, परंतु पॅट कमिन्सच्या अनुभवासमोर तो अपयशी ठरला. आखुड चेंडूवर पुल शॉट मारण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. झइघड चे विकेटसत्र कायम राहिले आणि शशांक सिंग ( ४) अपयशी ठरला. कूपर कॉनली एकटा खिंड लढवताना दिसला आणि त्याने अर्धशतकही पूर्ण केले, परंतु पंजाबच्या विजयासाठी त्याची झुंज पुरेशी नव्हती. हैदराबादने ३३ धावांनी विजय मिळवताना पंजाबला ७ बाद २०२ धावांवर रोखले. कॉनली ५९ चेंडूंत ७ चौकार व ८ षटकारांसह १०७ धावांवर नाबाद राहिला.

सनरायझर्स हैदराबाद गुणतालिकेत १४ गुणांसह अव्वल स्थानी आला आहे आणि पंजाब १३ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाबची गाडी घसरत चालली आहे आणि हा त्यांचा सलग तिसरा पराभव आहे. त्यामुळे त्यांचा असाच खेळ शिल्लक राहिला, तर अन्य संघांना संधी मिळू शकते. आरसीबी व राजस्थान रॉयल्स हे संघ प्रत्येकी १२ गुणांसह अव्वल चारमध्ये आहेत. गुजरात टायटन्स ( १२) व चेन्नई सुपर किंग्स ( १०) हेही अजून शर्यतीत आहेत. त्यामुळे अव्वल चारमधील संघांची चुक इतरांसाठी निर्णायक ठरू शकते.

अभिषेककडे ऑरेंज कॅप

अभिषेक ४७५ धावांसह ऑरेंज कॅपच्या शर्यतीत अव्वल क्रमांकावर पोहोचला आहे. लोकेश राहुल ( ४४५), हेनरिच क्लासन ( ४२५), वैभव सूर्यवंशी ( ४०४) व संजू सॅमसन ( ४०२) हे टॉप फाईव्हमध्ये आहेत.क्षेत्ररक्षणातील चुका भोवल्या

पंजाब किंग्सच्या क्षेत्ररक्षकांनी फिल्डिंग कशी करू नये, हे आज दाखवून दिले. इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मधील सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात पंजाबच्या शशांक सिंग, कूपर कॉनली व ल्युकी फर्ग्युसन यांनी सोपे झेल टाकले. ३ झेल आणि एक स्टम्पिंग संधी गमावल्यामुळे फिरकीपटू यझवेंद्र चहल खूपच वैतागला होता. पंजाबचा नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय पहिल्या १० षटकांत योग्य ठरला असता, परंतु खेळाडूंनी चुकांमागून चुका केल्या. अभिषेक शर्माने १३ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ३५ धावांची वादळी सुरुवात करून देताना ट्रॅव्हिस हेडसह पहिल्या विकेटसाठी ३.३ षटकांत ५४ धावा जोडल्या. हेड १९ चेंडूंत ३ चौकार व ३ षटकारांसह ३८ धावांवर माघारी परतला. या दोघांना अनुक्रमे ल्युकी फर्ग्युसन व युझवेंद्र चहल यांनी माघारी पाठवले. सातव्या षटकात हेडची विकेट पडली आणि त्यानंतर पुढच्याच षटकात कूपर कॉनलीने इशान किशनचा (९) सोपा झेल टाकला. हेनरिच क्लासनचाही सोपा झेल शशांक सिंगने टाकला. शशांकने ३ सामन्यांत सोडलेला हा सहावा झेल ठरला. चहलच्या पुढच्या षटकात झेल सोडण्याचे सत्र सुरूच राहिले आणि इशानला १८ धावांवर फर्ग्युसनने जीवदान दिले.

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल-मुख्यमंत्री फडणवीस



## जायकाकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

मुंबई : महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही ए'मेडिकल केअर सिस्टम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता 'स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.एकूणच, जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## तापमानवाढीचा दूध व्यवसायाला फटका

**लातूर/प्रतिनिधी :** उष्माघात, पाण्याची कमतरता आणि वाढत्या उकाड्यामुळे जनावरे कमी दूध देत आहेत. याचा फटका शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर होत अ यंदाच्या उन्हाळ्यात तापमानात झालेली तीव्र वाढ ही दूध व्यवसायासाठी गंभीर आव्हान ठरत आहे. कडक उन्हामुळे गाई-म्हशींच्या आरोग्यावर थेट परिणाम होत असून, त्यांच्या दुधाच्या उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. उष्माघात, पाण्याची कमतरता आणि वाढत्या उकाड्यामुळे जनावरे कमी दूध देत आहेत. याचा फटका शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर होत आहे. १५ ते २० टक्के उत्पादनात घट: तापमानवाढीचा परिणाम केवळ उत्पादनावरच नाही तर, जनावरांच्या एकूण कार्यक्षमतेवरही होत आहे. दिवसभराच्या उष्णतेमुळे जनावरे कमी खातात, अधिक वेळ निष्क्रिय राहतात आणि त्यामुळे त्यांच्या शरीरातील ऊर्जा कमी होते. याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर दिसून येत आहे.

## शहरातील इंधन पुरवठा सुरळीत, ग्रामीणमध्ये विस्कळीत

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर आणि परिसरात मागील दोन दिवसांपासून निर्माण झालेली इंधनाची टंचाई अखेर दूर झाली आहे. सोमवारी संध्याकाळपासून डेपोतून इंधन पुरवठा सुरळीत झाल्याने पेट्रोल पंपांवर इंधन उपलब्ध झाले असून वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी तुटवड्याची परिस्थिती होती.

सलग तीन दिवस आलेल्या सुट्ट्यांचा फटका इंधन पुरवठ्याला बसला. सोलापूर डेपोवरून आवश्यकतेनुसार पुरवठा न झाल्याने रविवारी संध्याकाळपासून शहरात इंधनाचा तुटवडा जाणवू लागला. त्यातच इंधनाचे दर वाढणार असल्याच्या अफवेमुळे नागरिकांनी पंपांवर अनावश्यक गर्दी केली. इंधन संपल्याने अनेक पंप बंद ठेवावे लागल्याने वाहनधारकांची मोठी गैरसोय झाली. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने पावले उचलत इंधन कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर सोमवारपासून परिस्थिती बदलली. दरम्यान, मंगळवारी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी शहरातील विविध पेट्रोल पंपांची तपासणी केली. तसेच, तालुका स्तरावरही विशेष पथकांद्वारे अचानक तपासणी मोहीम राबवण्यात आली. सध्या सर्व परिस्थिती पूर्वपदावर येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अफवांमुळे वाढली गर्दी; पेट्रोल पंपांचीअधिकाऱ्यांकडून धडक तपासणी लातूरमध्ये इंधनाचा तुटवडा निर्माण होण्यामागे पुरवठा साखळीतील विस्कळीतपणासोबतच इंधन दरवाढीची अफवा देखील मोठी कारणीभूत ठरली. दरवाढीच्या शक्यतेने वाहनधारकांनी अनावश्यक खरेदीसाठी पंपांवर रांगा लावल्या होत्या. दरम्यान, टंचाईच्या काळात कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला. जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी स्वतः पंपांची तपासणी केली. तसेच, तालुकास्तरावर विशेष पथके स्थापन करून पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करण्यात आल्याने प्रशासनाचा वचक निर्माण झाला आहे

## मुरूड येथे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर, धिरज देशमुख यांनी केली कामाची पाहणी



**मुरूड/प्रतिनिधी :** मुरूड शहराची वाढती लोकसंख्या तसेच परिसरातील नागरिकांची वाढती आरोग्यसेवेची गरज लक्षात घेऊन आघाडी सरकारच्या काळात ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीसाठी तब्बल २६ कोटी रुपयांचा निधी माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी मंजूर करून घेतला होता.

सध्या या उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम वेगाने प्रगतीपथावर असून धिरज विलासराव देशमुख यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देत कामाची पाहणी केली. यावेळी सुरू असलेल्या बांधकामाचा सविस्तर आढावा घेत संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना व ठेकेदारांना आवश्यक त्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच वैद्यकीय अधिकारी आणि डॉक्टरांशी चर्चा करून भविष्यात मुरूड व परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम, आधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी संवाद साधला. ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, यासाठी हे रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

हे उपजिल्हा रुग्णालय भविष्यात मुरूड व परिसरातील नागरिकांसाठी मोठा आधार ठरणार असून ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी देणारे ठरेल, अशा भावना माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केल्या.यावेळी लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण यांच्यासह विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष,कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती.

## अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** वीर हनुमान मंदीर बार्शी रोड यांच्या वतीने ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज माऊली औसेकर, गहिनीनाथ महाराज औसेकर व गुरूबाबा महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १० मे ते १६ मे या कालावधीत ह.भ.प. ज्ञानेश्वरदेव अष्टेकर यांच्या सानिध्यात अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दररोज काकडा आरती, विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, महिला भजनी मंडळ, हरिपाठ व दररोज रात्री हरिकीर्तन असा भरगच्च कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत. तरी लातूर परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन द्वारकादास सोनी, सूर्यभान सगर, रविशंकर केंद्रे, डॉ.



सुरेंद्र कोतवाडे, गणपतराव माने, मलवाड आदिंनी केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बार्शी रोड येथील हनुमान मंदिरच्याव तीने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजीत करण्यात येतो. यावर्षीही दि. १० ते १६ मे या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत हभप खडके महाराज, हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, गोपाळ महाराज धारखेडकर, हभप लक्ष्मण महाराज देवकर, हभप विठ्ठल महाराज वासकर, हभप गुरू महाराज देगलूरकर यांचे कीर्तन होईल तर दि. १७ मे रोजी हभप बन गुरूजी महाराज उदगीरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. तरी सर्व धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त प्रकाश नगर वासियांच्या वतीने करण्यात आले आहे.

## टेंडर एकाच्या नावे अन् वाळू उपसा करतो दुसराच...!



निलंगा तालुक्यातील शिऊर येथील वाळू घाटावरील प्रकार
अधिकृत टेंडर धारकाला वाळू मिळेना... लाखो रूपये भरुन उपयोग तरी काय?

**निलंगा/मोईज सितारी :** अवैध वाळू तस्करी करून मोठ्या प्रमाणात पैसा कमावण्यचे प्रकार सध्या वाढले असून चोरट्या मार्गाने वाळू उत्खनन रोखण्यासाठी अनेकदा प्रयत्न करूनही कांहीच उपयोग होत नाही प्रशासनाला आता ही बाब नित्याचीच झाली आहे. मात्र वाळू उपसा करण्याचे अधिकृत टेंडर सुकल्यानंतरही त्या वाळूवर 'डल्ला' मारत असल्याचा प्रकार शिऊर ता. निलंगा येथील वाळू घाटावर उघड झाला असून अधिकृत ठेकेदारानी थेट याबाबत तहसीलदाराकडे तक्रार केली असून याबाबत अद्याप कोणतीही कारवाई केली जात नसल्यामुळे माझे वाळू लिलावात भरलेले पैसे परत द्या अशी मागणी त्यांनी थेट जिल्हाधिकारी केली आहे. लाखो रुपये अधिकृत टेंडर सुटल्यानंतर भरूनही वाळू मिळत नसेल तर काय उपयोग असा हताश सवाल त्यांच्याकडून केला जात आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला थेट केराची टोपली दाखवण्यात येत आहे. सध्या मोठ्या प्रमाणात निलंगा तालुक्यात वाळू चोरीचा प्रकार सुरू असल्यामुळे याला प्रशासनाचे अभय असल्याची उलट सुलट चर्चा सुरू आहे. निलंगा तालुक्यातून मांजरा व तेरणा नद्या वाहतात या दोन्ही नद्यावर जवळपास २० ते २२ वाळू घाटाचे ठिकाण असून त्यामध्ये गिरकचाळ, शिरोळ, मानेजवळगा, औरादशहाजानी, शिऊर, सावरी, बामणी हे घाट अतिशय संवेदनशील आहेत. तरीही येथील वाळू चोरी थांबलेली नाही. याबाबत स्थानिक तलाठी, मंडळ आधिकारी व वाळू माफियांचे लागेबांधे असल्यामुळे सर्रासपणे चोरीचे प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. शिवाय मांजरा व तेरणा घाटावरील वाळू चोरीबाबत अनेक वेळा वरिष्ठ पातळीवर तक्रारी करूनही त्याचा काहीच उपयोग होत नाही. या रकारमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. तरीही प्रशासनाला याचे देणे घेणे नसल्यागतची स्थिती निर्माण झाली आहे.

सध्या मांजरा व तेरणा या दोन्ही नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा असतानाही बोटीद्वारे (परवानगी नसताना) येथे बोटीद्वारे वाळू उपसा सुरू आहे. केवळ कागदोपत्री कारवाई दाखवण्यासाठी महसूल प्रशासनाकडून तीन-चार महिन्याला एक दोन बोटी उडवल्याच्या प्रकार सर्वश्रुत झाला आहे. शिऊर ता. निलंगा येथील घाट क्रमांक दोनचा शासनाकडून अधिकृत लिलाव जाहीर करण्यात आला असून पटेल ट्रेडर्स शिऊर यांनी सर्वोच्च बोली बोलल्याने त्यांना बावीस लाख २९ हजार ८०० रुपयांना बहाल करण्यात आला असून हि प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन पध्दतीने पूर्ण झाली आहे. मात्र धनेगाव ता. देवणी येथील कुमार रविंद्र पाटिल यांच्याकडून राजरोसपणे अवैध मार्गाने माझ्या लिलाव क्षेत्रातील वाळूची उचल करून विक्री करत आहेत. याबाबतची विचारणा केली असता नदी तुझ्या बापाची नाही.. तू टेंडर घेतला म्हणून काय झाले अशी दमबाजी करून वाळू घेऊन जात असल्याची तक्रार तहसीलदाराकडे केली आहे ही तक्रार देऊन महिना उलटला तरी अद्याप महसूल प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झाली नाही त्यामूळे माझे डिपॉझिट व भरलेले पैसे परत द्यावे अशी मागणी पटेल ट्रेडर्सचे मालक महामुद पटेल यांनी थेट जिल्हाधिकाऱ्याकडे केली आहे. ऑनलाइन पद्धतीने चलन भरून वाळू उचलण्याचा अधिकार फक्त मला असताना चोरट्या मार्गाने दमदाटी व आरोगंडपणा करत अवैधरित्या वाळूचा उपसा केला जात असल्याचे त्यांची तक्रार आहे याबाबत अद्याप कोणतेही कारवाई झाली नाही.

## निलंग्यात भाजपाचा जल्लोष; विविध राज्यांतील यशानंतर कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त विजयोत्सव



**निलंगा/मोईज सितारी :** पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरी येथील विधानसभा निवडणुकांमध्ये तसेच महाराष्ट्रातील बारामती व राहुरी पोटनिवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष व महायुतीला मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर निलंगा शहरात भाजपाच्या वतीने मोठ्या उत्साहात विजयोत्सव साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवल्याचा आनंद कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे व्यक्त केला.

निलंगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पेढे वाटप, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणाबाजी करत वातावरण जल्लोषमय झाले होते. विजयाचा जल्लोष सुरूच आणि मोदीजींच्या नेतृत्वावर जनतेची पुन्हा मोहर अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला.

या विजयोत्सवाची सुरुवात भारतीय जनता पार्टी जनसेवा संपर्क कार्यालयात करण्यात आली. यावेळी भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, जिल्हा उपाध्यक्ष शेषराव ममाळे, शहराध्यक्ष रवी फुलारी, मनोज कोळे मीडिया अध्यक्ष सुमित इनानी नगरसेवक विरभद्र स्वामी,ईश्वर पाटील, रमेश कांबळे,सचिन गायकवाड ,दत्ता मोहोळकर,धर्मप्रकाश निंबाळकर,व अविराज पाटील, तम्मा माडिबोने,नसीम खतीब,अर्जुन पौळ पिंटू पाटील,भगवान वरवटे महादू पटणे गजानन सुरवसे बालाजी दंडगुले राहुल सुरवसे रजनी सूर्यवंशी व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी पक्षाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत, भविष्यातही जनतेच्या विश्वासास पात्र राहून विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. निलंगा शहरात साजरा झालेला हा विजयोत्सव कार्यकर्त्यांच्या उत्साहाचे आणि संघटनात्मक बळाचे प्रतीक ठरला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# इंधन टंचाईमुळे वाहनांच्या रांगा:२ दिवसांपासून पेट्रोल पंपांवर इंधन शिल्लक नसल्याचे फलक



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- शहरासह जिल्ह्यातील विविध भागात पेट्रोल व डिझेलची टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी मागणी वाढल्याचा हा परिणाम असल्याचा दावा केला आहे. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी पुरवठादार कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. साठा असतानाही विक्री होत नसल्याचे आढळल्यास संबंधित चालकावर कारवाई होईल.

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पेट्रोल व डिझेलची टंचाई असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. पेट्रोलपंपावर डिझेल व पेट्रोल संपल्याचे फलक लावण्यात आले आहेत. तसेच काही ठिकाणी इंधन उपलब्ध आहे; मात्र तेथे लांब रांगा लागल्या आहेत.

गेल्या चार ते पाच दिवसांपासून पेट्रोल व डिझेलच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. दररोज डिझेलची ६०२ के.एल. (किलोलीटर) मागणी असते; मात्र आता ही मागणी गेल्या पाच दिवसांपासून ७५९ के.एल.पर्यंत पोहोचली आहे. पेट्रोलची मागणी १९२ के.एल. असते; मात्र या पाच दिवसांमध्ये ही मागणी २७५ के.एल.वर पोहोचली आहे.

सर्व पुरवठादारांकडे इंधनाचा मुबलक साठा उपलब्ध आहे. सर्व पेट्रोल पंपांना आवश्यकतेनुसार व मागणीनुसार साठा पुरवला जात आहे. इंधनाची कसलीही टंचाई नाही. यासाठी पथकांच्या माध्यमातून पाहणी केली जात आहे. स्वाती शेंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी

जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंप चालकांकडे इंधनाचा साठा उपलब्ध आहे; परंतु अचानक इंधनाची दरवाढ होऊन उपलब्ध साठ्यातून अधिक नफा मिळवण्याच्या उद्देशाने काही पंपचालक इंधनाचा अवैध साठा करत असल्याची चर्चा आहे. पश्चिम बंगालसह विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर दरवाढ होणार असल्याचे अंदाज बांधण्यात येत आहेत.

# खंडाळा तलाव मृत साठ्यात, पाण्याचा प्रश्न, तरी उपसा सुरू:पिण्याच्या पाण्याची टंचाईसदृश स्थिती



काक्रंबा (प्रतिनिधी)-तुळजापूर तालुक्यातील खंडाळा गावच्या तलावातील पाणी पातळी मृत साठ्याच्या खाली गेली आहे. फक्त एक दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक असतानाही शेतकऱ्यांकडून बेसुमार पाणी उपसा सुरू आहे. तलावातून तब्बल ३५ ते ४० विद्युत मोटारींच्या साह्याने बेसुमार पाणी उपसा करण्यात येत आहे. याकडे मात्र खुद्द गावकारभाऱ्यांसह महसूल व जलसंधारण विभागाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याने सध्या तलावातील मासे तडफडत असून, पशुधनासह गावचा पाणीप्रश्न बिकट बनला आहे.

तुळजापूर तालुक्यातील खंडाळा गावालगतच्या तलावातील पाण्याने सध्या तळ गाठला आहे. काही गावचे तलाव मृतसाठ्यात गेले आहेत. सध्या याच तलावातून निर्ढावलेल्या शेतकऱ्यांकडून ३५ ते ४० विद्युत मोटारीच्या साह्याने दिवस-रात्र बेसुमार उपसा करण्यात येत आहे. दिवसेंदिवस तलावातील पाणी पातळी झपाट्याने खलावत असून, सध्या तलावातील पाणी मृत साठ्याच्या खाली गेल्याने तलावातील मासे तडफडत आहेत. केवळ तलावात एक ते दोन दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. मृत साठ्यातून शेतीसाठी ३५ ते ४० विद्युत मोटारीच्या साह्याने पाणी उपसा करण्यात येत आहे. याकडे मात्र ग्रामपंचायत जलसंधारण विभाग व महसूल प्रशासनाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याने पशुधनासह गावचा पाणीप्रश्न बिकट बनला आहे. या वर्षी पाऊस काळ उशिरा व अत्यल्प प्रमाणात झाल्यास भविष्यात खंडाळा ग्रामस्थांना भीषण पाणी प्रश्न भेडसावेल. तातडीने उपाययोजना न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असून, प्रशासनाने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

# जागतिक पुस्तक दिनानिमित्त वैद्यकीय विद्यार्थ्यांना ज्ञानभेट ; बालरोग परिषदेकडून २५० हून अधिक पुस्तके प्रदान

धाराशिव दि.६ मे (जिमाका) वाचन संस्कृतीला चालना देत वैद्यकीय शिक्षण अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने जागतिक पुस्तक दिनानिमित्त बालरोग परिषद, धाराशिव शाखेकडून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पुस्तके भेट देण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

दि.२३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी बालरोग विषयक महत्वाची व उपयुक्त अशी एकूण २५० हून अधिक पुस्तके प्रदान करण्यात आली.या पुस्तकांमुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना तसेच निवासी डॉक्टरांना अभ्यासासाठी मोलाची सहाय्यता होणार असल्याचे सांगण्यात आले.

जागतिक पुस्तक दिन दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो.या दिवशी वाचनाची संस्कृती वाढावी, ज्ञानाचा प्रसार व्हावा आणि समाजात पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित व्हावे हा मुख्य उद्देश असतो.या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान,वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. प्रवीण डुमणे,बालरोग विभागप्रमुख डॉ.शाम चौधरी,डॉ.घोगरे,डॉ. निलोफर भोरी तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय सोनटक्के,डॉ. बागल,डॉ.देशमुख आणि ग्रंथपाल श्री. निलेश खोलासे यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांनी बालरोग परिषद, धाराशिव शाखेचे आभार मानत सांगितले की,अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होते आणि त्यांच्या सर्वांगीण ज्ञानविकासास मदत होते.यावेळी बालरोग परिषद,धाराशिव शाखा अध्यक्ष डॉ.दत्तात्रय खुणे,सचिव डॉ. नितीन भोसले,ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ.अभय शहापूरकर तसेच डॉ.हंबीरे यांचीही उपस्थिती होती.

# मृत्यूचा सापळा ठरलेला राज्य मार्ग क्र. ६८! निष्काळजी ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी!

धाराशिव (अंजुम शेख): धाराशिव शहरातील जिजाऊ चौक ते बोरफळ (राज्य मार्ग क्र. ६८) या रस्त्याचे रखडलेले आणि निष्काळजीपणे सुरू असलेले काम आता नागरिकांच्या जीवावर उठल्याचा संतापजनक व्यक्त केला जात आहे. अनेक वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेल्या या रस्त्यामुळे वारंवार भीषण अपघात घडत असून अखेर एका निष्पाप युवकाचा बळी गेल्यानंतर संतप्त नागरिकांनी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर थेट मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

५ मे २०२६ रोजी रात्री सांजा गावाजवळ पुलाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी कोणतेही संरक्षण कठडे, रेडियम चिन्ह, दिशादर्शक फलक किंवा इशारे नसल्यामुळे भंडारवाडी येथील ओम दिलीप अंधारे या युवकाची दुचाकी थेट पुलासाठी खणलेल्या खोल खड्ड्यात जाऊन आदळली. या भीषण अपघातात ओम अंधारे यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, याच ठिकाणी दोन दिवसांपूर्वी एका स्कॉर्पिओ गाडीचाही गंभीर अपघात झाला होता. त्या अपघातात तीन ते चार जण गंभीर जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. वारंवार अपघात होत असतानाही संबंधित ठेकेदार आणि अधिकारी मात्र ढिम्म असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कामाच्या ठिकाणी सुरक्षेची कोणतीही उपाययोजना नसल्याबाबत अनेकदा तक्रारी आणि सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र ठेकेदाराने ना संरक्षण कठडे लावले, ना इशारे दिले, ना रेडियम चिन्हांचा वापर केला. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने जीवघेणे अपघात घडत आहेत.

MSIDC मार्फत सुरू असलेल्या या कामावर कोणताही अधिकारी पूर्णवेळ उपस्थित राहत नसल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. संपूर्ण मराठवाड्यासाठी केवळ एकच कार्यकारी अभियंता नियुक्त असल्यामुळे कामाची गुणवत्ता, देखरेख आणि वेळेत पूर्तता याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन देत संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. आणखी किती निष्पाप जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

धाराशिवकरांच्या दृष्टीने हा रस्ता आता विकासाचा नव्हे तर मृत्यूचा मार्ग बनला असून प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# तडवळा रोडवरील एका पेट्रोल पंपावर अवैध इंधन विक्रीचा प्रकार उघड



धाराशिव( अंजुम शेख ): धाराशिव जिल्ह्यातील तडवळा रोड परिसरातील एका पेट्रोल पंपावर नियमांचे उल्लंघन करून अवैध पद्धतीने इंधन विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पेट्रोल पंपावर बाटल्या व डब्यांमध्ये इंधन देण्यास बंदी असताना देखील खुलेआम अशा प्रकारे इंधनाचे वितरण सुरू असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पेट्रोल पंपावर सुरक्षा नियमांचे उल्लंघन करून पेट्रोल व डिझेलची विक्री प्लास्टिकच्या बॅरल व इतर भांड्यांमध्ये केली जात आहे. यामुळे आग लागण्याचा धोका निर्माण होत असून, परिसरातील नागरिकांच्या जीवितास मोठा धोका संभवत आहे.

या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच अशा बेकायदेशीर विक्रीमुळे शासनाच्या नियमांची पायमल्ली होत असल्याचेही बोलले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी संबंधित विभागाने कडक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हा कार्यालयात आढावा बैठक उत्साहात संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) धाराशिव जिल्हा अल्पसंख्याक विभागाची आढावा बैठक आज जिल्हा कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संघटन बळकटीकरण, आगामी राजकीय रणनीती तसेच विभागीय कामकाजाचा आढावा या बैठकीत घेण्यात आला.

या बैठकीस निरीक्षक म्हणून जावेद खरेदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच जीवनरावजी गोरे, राष्ट्रीय अध्यक्ष युवती सक्षनाताई सलगर, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील, जिल्हाध्यक्ष तोफिक भाई शेख यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक यशस्वीरित्या पार पडली. अल्पसंख्याक विभागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

बैठकीदरम्यान प्रदेश सरचिटणीस मसूद भाई शेख, कादरभाई खान, युवक जिल्हाध्यक्ष शेखरजी घोडके, महिला जिल्हाध्यक्ष मनीषाताई पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक बबलू शेख, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश तांबारे, ज्योतीताई माळाळे, रमेश देशमुख, अहमद काजी, नगरसेवक सुनील आंबेकर, पंकज भोसले, सर्फराज कुरेशी, नर्सिंग मेटकरी, इजाज काजी, शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष प्रा. जालिंदर पोळ, अभियंता सेल जिल्हाध्यक्ष सुरज वडवळे, ॲड. योगेश सोन्नेपाटील, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ड. अविनाश जाधव, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष दत्ताजी राऊत, शहर उपाध्यक्ष हेमंत भोरे, असिफ शेख, सुरज सुकळे, अनिल जाधव, संघटित कामगार सेल जिल्हाध्यक्ष सरफराज पटेल, असंघटित कामगार सेल जिल्हाध्यक्ष उमेश शिरसाटे, मलंग शेख, माजी नगरसेवक बाबा मुजावर, लीगल सेल तालुका अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आव्हाड, लीगल सेल शहराध्यक्ष किरण रोकडे, वैद्यकीय मदत जिल्हाध्यक्ष डॉ. सय्यद फाद, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कसबे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी विविध उपाययोजना, कार्यकर्त्यांचे प्रबोधन, तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची भूमिका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या धोरणांनुसार जनतेपर्यंत पोहोचण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीच्या शेवटी जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व पक्ष बळकटीसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649